शनिवार, २१ जानेवारी २०२३
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१५२
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SATURDAY 21 JANUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-152 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5

# पाच एकर कांद्याच्या रोपात अज्ञात इसमाने मारले तणनाशक

## ५१ हजारांचे नुकसान : कित्येक टन कांदा उत्पादन करण्याच्या आशेवर फिरले पाणी

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन येथील हर्सूल सावंगी शिवारातील सुनील पूनमचंद वर्मा यांच्या गट नंबर 13 मध्ये त्यांच्या बटाईदार असलेल्या शेतकऱ्याने 12 किलो कांद्याचे बी सुमारे दीड महिन्यापूर्वी टाकले होते. आत्ता हे रोप लागवडीस आलेले होते. त्यामुळे बटाईदार असलेले कारभारी परदेशी या शेतकऱ्याने पाच एकर रान कांदा लागवडीस मशागत करून तयार केले होते. मात्र कोणीतरी अज्ञात व्यक्तीने सदर कांद्याच्या रोपात अल्ट्राझीन व युरिया एकत्र करून तणनाशक या कांद्याच्या रोपास फवारले त्यामुळे सर्व कांद्याचे रोप पिवळे पडत असून सुकून जात आहे. त्यामुळे शेतकरी मात्र खर्च करून मेटकुटीस आला आहे व हवालदिल झाला आहे. दरम्यान याबाबत सदर शेतकऱ्याने शिल्लेगाव पोलीस ठाण्याला तक्रार दाखल केली असून अज्ञात इसमावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.



मी सुनील वर्मा यांची शेती बटाईने धरलेली आहे . त्यामुळे मी दीड महिन्यापूर्वी पाच एकर शेतात कांदा लागवड करण्यासाठी बारा किलो कांद्याचे बी पंचवीस हजार रुपये खर्चून विकत घेतले होते . बी टाकण्यापूर्वी शेतीची मशागत खर्च तीन हजार रुपये व रोप आल्यानंतर दोन वेळेस निंदणी/खुरपणी, खत यास आठ हजार असा रोप लागवडीस येईपर्यंत 36 हजार रुपये तर ते रोप लागवडीस पाच एकर जमीनीची मशागत त्यात नांगरट, रोट्याव्हेटर, बेड पाडणे यास दहा हजार रुपये खर्च व लागवडीपूर्वी पाच एकर शेतात पाच हजार रुपयांच्या दहा गोण्या सुपर फॉस्पेट खत मारले, असा खर्च केलेला असताना असताना कोणीतरी अज्ञात व्यक्तीने या कांद्याच्या रोपात तणनाशक मारल्याने ऐन लागवडीच्या वेळेस कांद्याचे रोप जळून जात असल्याने तब्बल एक्कावन्न हजार रुपयांचा खूप मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे .

**कारभारी परदेशी ( शेतकरी )**

# गूगलही १२ हजार कर्मचाऱ्यांना काढणार

## मुख्य कार्यकारी अधिकारी सुंदर पिचाईंची ईमेलद्वारे घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : गूगलची मातृसंस्था असणारी अल्फाबेट ही कंपनी सुमारे १२ हजार जणांना नोकरीवरून काढणार आहे. संबंधित कंपनीने जगभरातील एकूण कर्मचाऱ्यांपैकी ६ टक्के नोकरीकपात करण्याचा निर्णय घेतला आहे. या नोकरकपातीचा जागतिक स्तरावर आणि संपूर्ण कंपनीतील कर्मचाऱ्यांवर परिणाम होईल. गूगलचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुंदर पिचाई यांनी शुक्रवारी एका ईमेलद्वारे नोकरकपातीची घोषणा केली. या निर्णयाची संपूर्ण जबाबदारी आपण घेत आहे, असेही पिचाई यांनी ईमेलमध्ये लिहिले.**

मागील काही काळात तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्या मेटा, ट्विटर आणि ॲमेझॉनसह इतर अनेक कंपन्यांनी नोकरकपात केली आहे. ढासळती जागतिक अर्थव्यवस्था आणि वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर गूगलनेही नोकरकपात करण्याचा निर्णय घेतला. विशेष म्हणजे गूगल ही सर्वात मोठी तंत्रज्ञान कंपनी आहे. या कंपनीत लाखो लोक काम करतात. ही कंपनी मोठ्या प्रमाणात नोकरकपात टाळत आहे. परंतु डिजीटल जाहिरातींमध्ये कंपनीला मंदीचा सामना करावा लागत आहे. परिणामी ही नोकरकपात करण्याचा निर्णय घेण्यात आला. पिचाई यांनी ईमेलमध्ये लिहिले, आमचे लक्ष्य अधिक स्पष्ट करण्यासाठी हा महत्त्वाचा क्षण आहे. कंपनीचे भांडवल आणि कंपनीतील वर्कफोर्स योग्य दिशेने वळवणे हे आमचं सर्वोच्च प्राधान्य आहे.




# ८८ व्या वर्षी आजोबांना लागली ५ कोटींची लॉटरी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** पंजाबमधील डेरा बस्सी येथील त्रिवेदी कॅम्पमध्ये राहणाऱ्या एका ८८ वर्षीय आजोबांचे नशीब पालटल आहे. शिवाय मागील ३५ ते ४० वर्षापासूनचे त्यांचे स्वप्न पूर्ण झाले आहे. कारण या आजोबांना एक दोन नव्हे तर तब्बल ५ कोटी रुपयांची लॉटरी लागली आहे. महंत द्वारकादास असे या लॉटरी जिंकलेल्या आजोबांचे नाव आहे. या घटनेची माहिती देताना सहाय्यक लॉटरी संचालक करम सिंग यांनी सांगितले की, पंजाब राज्य लोहरी मकर संक्रांती बंपर लॉटरी २०२३ चा निकाल १६ जानेवारीला ऑनलाईन घोषित करण्यात आला. त्यामध्ये डेराबस्सीच्या द्वारका दास या ८८ वर्षीय आजोबांनी ५ कोटी रुपयांचे पहिले लॉटरीचे बक्षिस जिंकले. शिवाय लॉटरीशी संबंधित काही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ३० टक्के कराची रक्कम कट करुन उर्वरीत सर्व पैसे द्वारकादास यांना दिले जातील. पाच कोटींचे पहिले बक्षिस जिंकणाऱ्या महंत द्वारकादास यांचा मुलगा नरेंद्र कुमार शर्मा याने सांगितले की, 'मला खूप आनंद झाला आहे.' तर द्वारकादास यांनी म्हणाले, मी मागील ३५ ते ४० वर्षांपासून लॉटरीचे तिकीट खरेदी करत आहे, आणि यावेळी मी लॉटरी जिंकली आहे.

# पोलीस निरीक्षकाची दादागिरी; पत्रकाराला जातिवाचक शिवीगाळ

## न्याय न मिळाल्यास पोलीस अधीक्षकांना दिला आमरण उपोषणाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

सिल्लोड : "सद्रक्षणाय खलनिग्रहणाय"



पत्रकार संदीप मानकर

हे महाराष्ट्र पोलीसांचे ब्रीदवाक्य आहे. याचा अर्थ असा की, महाराष्ट्र पोलीस सज्जनांचे रक्षण करण्यास आणि दुर्जनांवर नियंत्रण ठेवून त्यांचा नायनाट करण्यास कटिबध्द आहेत. मात्र पैठणच्या पोलीस निरीक्षकाने या ब्रीद वाक्याला काळिमा फासण्याचे कृत्य केले आहे. पैठणचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी दादागिरीतून एका पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्त्याची कॉलर पकडून समोरील रस्त्याने वेगाने येणाऱ्या वाहनापुढे ढकलून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. सदरील कार्यकर्त्याने मी अनुसूचित जाती प्रवर्गातला एक सामाजिक कार्यकर्ता असून मी पत्रकार देखील आहे, असे सांगितल्यावर जाणून-बुजून पवार यांनी जातीवाचक शिवीगाळ केली व तुझ्यासारखे 56 येतात, असे हिणवून वर्दीवरील स्वतःच्या नावाची पट्टी दाखवीत मी पोलीस निरीक्षक किशोर पवार आहे, माझे काय करायचे ते करा, कुणाकडे जायचे ते जा, अशी चिथावणी देत सज्जड दम दिला. एक जानेवारी रोजी सिल्लोड येथे कृषी प्रदर्शनाच्या उदघाटनप्रसंगी पत्रकार तथा मातंग एकता आंदोलन या राज्यव्यापी सामाजिक संघटनेचे औरंगाबाद जिल्हाध्यक्ष संदीप मानकर हे तहसील कार्यालयासमोरून रस्ता ओलांडत असताना चारचाकी पोलीस वाहन एकदम जोरात आले व मानकर यांच्या पायाजवळ येऊन वाहन चालकाने ब्रेक दाबले. तितक्यात मानकर हे वाहन चालकाला वाहन हळू चालवा, अशी विनंती केली. यावेळी पैठणचे पोलीस निरीक्षक यांनी काहीही न बोलता मानकर यांची कॉलर पकडत भरधाव येणाऱ्या क्रूझर वाहनापुढे ढकलून दिले. तितक्यात त्या चालकाने प्रसंगावधान राखीत करकचून ब्रेक दाबल्याने मानकर थोडक्यात बचावले.

म्हणून मानकर यांनी पवार यांना परिचय देत असताना मी माजी गृहराज्यमंत्री असलेले रमेश बागवे यांच्या मातंग एकता आंदोलन या राज्यव्यापी सामाजिक संघटनेचा जिल्हाध्यक्ष आहे, असे सांगितले. त्यावर पवार म्हटले की, अशा डफड्यावाल्यांच्या संघटना कधीपासून निघायला लागल्या आणि तू कुणीही असो तुझ्यासारखे मला रोज 56 भेटतात, असे बोलून खालच्या पातळीवर जात-जातीवाचक शिवीगाळ केली. यावेळी समोर हा प्रकार बघणारे कार्यकर्ते व नागरिकांनी आक्रमक होत पवार यांना तुम्हाला आमच्या जातीचा एवढा द्वेष का? असे विचारले असता मी पी.आय. पवार आहे, तुम्ही माझ्या नेमप्लेटचा फोटो काढून घ्या काय उपटायचे ते उपटा अन कुणाकडे जायचे ते जा असे बोलून अपमानित केले. सदरील प्रकार हा अण्णा भाऊ साठे चौकात असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला होता, तर दुसऱ्या दिवसांपासून मानकर यांनी सिल्लोड शहर पोलीस ठाणे व नगरपरिषदेत सीसीटीव्ही फुटेज घेण्यासाठी चकरा मारल्या. शेवटी चार दिवसांनंतर सदरील फुटेज नादुरुस्त असल्याचे सांगून मानकर यांची बोळवण करण्यात आली. म्हणून सदरील प्रकरणात माझी कॉलर पकडून रस्त्याने वेगाने येणाऱ्या वाहनापुढे लोटून मला जीवे मारण्याचा प्रयत्न करणारे, मला जातीवाचक शिवीगाळ करणारे व पोलीस प्रशासनाच्या नावाला कलंक असलेले आणि दादागिरीने वेढलेले मुजोर पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करुन त्यांच्यावर अँट्रोसिटीचा गुन्हा दाखल करुन त्यांना निलंबित करावे या मागणीची लेखी तक्रार मानकर यांनी मा. मुख्यमंत्री, मा. गृहमंत्री, मा.गृहसचिव, मानवाधिकार आयोग, अनुसूचित जाती-जमाती आयोग, औरंगाबाद ग्रामीण पोलीस अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक औरंगाबाद परिक्षेत्र, उपविभागीय पोलीस अधिकारी सिल्लोड यांच्याकडे केली आहे. या प्रकरणात न्याय न मिळाल्यास त्यांनी औरंगाबाद ग्रामीण पोलीस अधीक्षकांना आमरण उपोषणाचा इशारा देखील दिला आहे.



**त्या ठिकाणी गर्दी खूप होती, रस्त्यावरीलल नागरिकांना मागे हटवण्यामधे वरील प्रकार झाला. कोणत्याही वैयक्तिक द्वेषातून घडले नाही.**

**किशोर पवार, पोलिस निरीक्षक , पैठण**




**सिल्लोड नगर परिषदचे सी.सी.टी.व्ही. खराब आहेत. मानकर यांना मी सोबत घेऊन पुरावे शोधंत आहे. अद्याप एकही पुरावा मिळाला नाही.**

**अशोक मुदीराज, पो. निरीक्षक, सिल्लोड**

# तुमची देहबोली सांगते तुमच्याबद्दल




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932



आधुनिक केसरी

मेंढ्यांच्या कळपात राहिलेल्या सिंहाच्या छाव्याची गोष्ट आपल्याला माहिती असेल. जेव्हा त्याला कळते की आपण सिंह आहोत, तेव्हा तो त्याच्या मूळ स्वरुपात येण्याचा प्रयत्न करतो. अशा तऱ्हेने आपल्या देहबोलीवर जरी इतरांचा, वातावरणाचा प्रभाव असला तरी, तो कमी करता येतो. स्वतःला बदलता येते. फक्त बदलण्याची इच्छा हवी. खुर्चीत बसताना ताठ बसले पाहिजे. पाठीचा कणा ताठ आणि सरळ असला पाहिजे. फोनवर बोलताना सुद्धा शक्यतो ताठ बसून, सरळ बसून फोन घ्यावा. बोलताना समोरच्याकडे बोट दाखवून बोलणे टाळावे. पाठीत पोक काढून ढिल्यासारखे बसणे टाळावे.

देऊ शकू. विशेषतः मोठ्या समूहाला संबोधित करणाऱ्या शिक्षक. प्राध्यापक यांना अशा प्रकारे देहबोली विकसित करावी लागते. त्याचप्रमाणे खेळाडू, अभिनेते, अभिनेत्री, नृत्यांगना, राजकीय नेते, पोलीस, अधिकारी इ ना सुद्धा त्याची गरज भासते. त्यांचे चालणे, बोलणे, हसणे, रागावणे, त्यांचे हावभाव, पदन्यास, चेहऱ्यावरील भाव, हातांची हालचाल यातून त्यांची देहबोली स्पष्ट होत असते.शिवरायाचा आठवावा प्रताप शिवरायाचा आठवावा साक्षेप, भूमंडळी. शिवरायाचे कैसे बोलणे, शिवरायाचे कैसे चालणे, शिवरायाचे सलगी देणे, कैसे असे. यापेक्षा देहबोलीचे उत्तम आणि आदर्श उदाहरण कोणते असू शकेल ? ( या छोट्याशा लेखात देहबोली संबधी सर्व मुद्द्यांचा परामर्श घेणे शक्य नाही. यासंबंधी अधिक जाणून घेऊ असणाऱ्या जिज्ञासूनी कृपया पुढील पुस्तके वाचावी. देहबोली – अंजली पेंडसे, Body Language- Your Success Mantra – Dr Shalini Verma, देह्बोलीविषयी सर्वकाही – ॲलन ॲण्ड बार्बरा पीज अनुवाद रोहिणी पेठे, देहबोली- रॉबर्ट फिप्स अनुवाद मनोज आचार्य, बॉडी लँग्वेज अर्थात देहबोली-कौलाचार्य जगदीश शर्मा अनुवाद सुधीर सेवेकर )



# आनंदी पहाट

## अंतरात्म्याला शोधण्याची गरज

आधुनिक केसरी

अंतरात्म्याला शांती मिळणे अत्यंत जरुरीचे असते, कारण त्यातच खरा आनंद असतो. आपल्या दैनंदिन गरजा भागवताना आपण केवळ शरीराचाच विचार करत असतो. अन्न, वस्त्र, निवारा ह्या तीनही गरजा खरे तर आपल्या शरीरासाठी आवश्यक असतात. आपल्याला त्या व्यतिरिक्त अजून एका गोष्टीची गरज असते, ती म्हणजे शांतीची. आपल्या अंतर्मनाला, अंतरात्म्याला शांती मिळणे मानसिक स्वास्थ्यासाठी अत्यंत आवश्यक असते. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या धावपळीत आपण आपली मुलभूत गरजच विसरून जातो, त्याची जाणीवच आपल्याला होत नाही. आपल्या जीवनातील सार कशात आहे, हे आपण स्वतःच शोधून काढायचे असते. त्याच्यासाठी आपल्या अंतरात्म्याचा शोध घेण्याची, त्याला समजून घेण्याची, त्याचा यथायोग्य विचार करण्याची जरुरी असल्याची आपल्याला जाणीव असलीच पाहिजे. आनंदाची गोडी अवीट असते, त्यामुळे आनंदप्राप्तीचा कधीच वीट येत नाही.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आनंदाची प्राप्ती करण्यासाठी सकारात्मक विचार, वर्तन, व्यवहाराची गरज असते. त्यायोगेच सकारात्मक वातावरणाची निर्मिती होऊ शकते. आनंदाची निर्मिती आपल्याच अंतरंगांत करावी लागत असते. आनंद प्राप्ती म्हणजेच खरी यशप्राप्ती असते; हे ज्या व्यक्तीला समजते, त्याच व्यक्तीला त्याच्या जीवनातील सार कशात आहे, हेही कळू शकते. आपल्या मनात येत असलेल्या प्रत्येक विचाराचा परिणाम कमी अधिक प्रमाणांत आपल्या मानसिकतेवर होत असतो. नकारात्मक विचारांचा विपरीत परिणाम होत असतो, तर सकारात्मक विचार यशप्राप्तीसाठी उपयुक्त ठरतात. आपल्या प्रत्येक कृतीपूर्वी विचार होण्याची जरुरी असते. आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक विचारांचा माध्यम म्हणून उपयोग करण्याची आपल्याला सतत जाणीव होणे आवश्यक असते.



आधुनिक केसरी

**अनाथांची माता | दिसली रे ||**
**पायाला लागावी | ओढ पंढरीची ||**
**आस विठ्ठलाची | मना लागो ||१||**
**जगुनी पाहिले | व्यवहारी जगी ||**
**स्वार्थाचेच भोगी | संगतीला ||२||**
**नाही प्रेम माया | आटला जिव्हाळा ||**
**कोरडा उमाळा | क्लेषदायी ||३||**
**अंगाईचा सूर | हरवला देवा ||**
**म्हणूनी या जीवा | सुख नाही ||४||**
**तुझ्या पायरीला | टेकता हा माथा ||**
**अनाथांची माता | दिसली रे ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरूपण

आधुनिक केसरी

**ईश्वराची एक योजना आहे, तो कोणासच निव्वळ सुख किंवा निव्वळ दुःख देत नाही.**

**सर्वांना सोबत घे. अन्यथा हिमाचलाचे शिखर सर करशील पण एकटा असशील तर तो शिखर सर करण्याचा आनंद क्षणिक ठरेल.**




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी

**सच्चिदानन्द स्वरुप है, मम अराध्य भगवान । बार बार वन्दन करुँ, युक्ति भेदरत ज्ञान ।।०४।। (स्वर्वेद प्रथम मण्वडल प्रथम अध्याय) ०१/०१/०४ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :** मी साच्चिदानंद स्वरूप आराध्य भगवंतांना सद्गुरूंच्या भेदिक-ज्ञान युक्तीने युक्त होऊन वारंवार नमस्कार करीत आहे. कसा समर्थ होऊ शकेन ?



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

# बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

आपण आता बद्धमुक्तनिरूपण समासाच्या शेवटाकडे आलो आहोत.स्वस्वरूपानुभव हे ज्ञानी पुरूषाचे प्रधान लक्षण आहे. पण नुसत्या देहावरून असे अनुमान काढणे योग्य होणार नाही. मानवी मनात अहंकार हा फार मोठा शत्रु आहे. हा अहंकार माणसाला स्वस्थता मिळू देत नाही. अहंकारावर विजय मिळवण्यासाठी परमार्थ साधना आवश्यक असते. हे माझ्या सारख्या सामान्य माणसाला पचवायला खूप जड जातं कारण आपणं शुन्यत्व मिरवू शकत नाही. एक साधं आपल्या व्यवहारी जगात वावरत असताना मलाचं सगळ्यांनी चांगले म्हणले पाहिजे हा आपला अट्टाहास असतो.पण आपलं कार्य जर शुन्य असेल तर लोक मला का विचारतील हा विचार न करण्याची बुद्धी असल्या कारणाने खोटा अहंकार सतत मिरवत असल्याने आत्मसाक्षात्कार होत नाही. प्रारब्धकर्मे जशी असतील त्याप्रमाणे वर्तन घडते. एखादा ज्ञानी मौन धरतो तर दुसरा एखादा निरूपण सांगेल. हे दोघेही मुक्त असतात .कारणं त्यांच्या स्वानुभवात फरक नसतो. एखाद्या वेळी स्वरूपसाक्षात्कार होऊन आत्मज्ञान झाले की देह स्तब्ध होतो. .त्याचे कर्म करणे थांबते त्यालाच तटस्थ अवस्था म्हणतात. पण मित्रांनो तटस्थपणा &स्तब्धता यांचा देहाशी संबंध असतो.




सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# वेदांत हा रोजच्या आचरणात आणला पाहिजे

आधुनिक केसरी

भगवंताची उपासना करणारे जे ऋषी असतात त्यांचे मन अशा एका अवस्थेमध्ये राहते की, त्या ठिकाणी परमात्माच सर्व काही करतो ही भावना स्पष्टपणे प्रकट होते. भगवंताशी एकरूप होऊन जाण्याचीच ती अवस्था आहे. ऋषींचा मीपणा नष्ट झालेला असल्याने, 'मी करतो, मी बोलतो, मी काव्य करतो,' ही भावनाच त्यांना नसून, 'परमात्मा करतो, परमात्मा बोलतो, परमात्मा मंत्र रचतो' असा स्पष्ट आणि खरा अनुभव त्यांना येतो. या थोर अवस्थेमध्ये ऋषींच्या तोंडून वेदमंत्र बाहेर पडलेले असल्यामुळे ते मानवाची कृती नव्हेत. वेद हे खरे अपौरुषेयच आहेत. घराच्या छपराखाली ज्याप्रमाणे सर्व लहान लहान खोल्या येतात, त्याप्रमाणे वेदांतात इतर शास्त्रे येतात. वेदांताच्या गोष्टी किंवा ज्ञान हे पक्वान्नांच्या ज्ञानाप्रमाणे आहे. जो मनुष्य वेदांताचा नुसताच अभ्यास करतो त्याला त्यापासून फारसा फायदा होत नाही. वेदांत हा रोजच्या आचरणात आणला पाहिजे. खरे म्हणजे विद्वान लोक हा वेदांत अत्यंत कठीण करून जगाला उगीच फसवितात. मग सामान्य माणसाला वाटते की, 'अरे, हा वेदांत आपल्यासाठी नाही !' वास्तविक, वेदांत हा सर्वांसाठी आहे. मनुष्यमात्रासाठी आहे. वेदांताशिवाय मनुष्याला जगताच येत नाही. आपले आकुंचित मन विशाल करणे, आपण स्वार्थी आहोत ते निःस्वार्थी बनणे, हेच खऱ्या वेदांताचे मर्म आहे.



भगवंताच्या प्राप्तीचे नियम आणि व्यवहारातील वस्तू प्राप्त करून घेण्याचे नियम यांमध्ये फरक आहे. मनामध्ये वासना उत्पन्न झाली असतां ती तृप्त करून घेण्यासाठी देहाची आणि वस्तूंची हालचाल करणे, हा व्यवहार होय. सूक्ष्म वासना देहाच्या सहाय्याने जड बनणे हे व्यवहाराचे स्वरूप आहे. याच्या उलट, भगवंत अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे, त्याची प्राप्ती करून घेणे म्हणजे जडामधून सूक्ष्माकडे जाणे आहे. तेव्हां भगवंताचे साधन हेही जडापासून सूक्ष्माकडे पोचविणारे असले पाहिजे. जड देहाशी संबंधित आणि सूक्ष्माशी निकट चिकटलेले असे साधन असेल तर ते एक नामच होय. जो नामात राहिला त्याचा वासनाक्षय झाला. पुष्कळ वेळा, चांगले अधिकारी जीव एखाद्या लहानशा वासनेमुळे अडकून पडतात. मग ते अध्यात्मदृष्ट्या चांगल्या कुळामध्ये जन्म घेतात. तिथे त्यांची वासना तृप्त व्हायला वेळ लागत नाही; म्हणून ते लहानपणीच जग सोडून जातात. त्यांच्या मृत्यूचे दुःख करणे बरोबर नाही. वासना ही दुसऱ्या कोणत्याही उपायांनी तृप्त होण्यासारखी नसून, आपण जर भगवंताजवळ 'वास' ठेवला तरच ती नष्ट होते. वासना नष्ट झाली की बुद्धी भगवत्स्वरूपच होईल. जेथे वासना संपली तेथेच भगवंताची कृपा झाली.

**आजचे बोधवचन आहे–**

**प्रत्येक वेदमंत्राच्या आरंभी 'हरिः ॐ' असते, ते नामच आहे.**

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती । रखुमाईच्या पती सोयरिया ॥१॥
गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देईं मज प्रेम सर्व काळ ॥ध्रु.॥
विठो माउलिये हा चि वर देईं । संचरोनि राहीं हृदयामाजी ॥२॥
तुका म्हणे कांहीं न मागे आणीक । तुझे पायीं सुख सर्व आहे ॥३॥
राजस सुकुमार मदनाचा पुतळा । रविशशिकळा लोपलिया ॥१॥
कस्तुरीमळवट चंदनाची उटी । रुळे माळ कंठीं वैजयंती ॥ध्रु.॥
मुगुट कुंडले श्रीमुख शोभलें । सुखाचें ओतलें सकळ ही ॥२॥
कासे सोनसळा पांघरे पाटोळा । घननीळ सांवळा बाइयानो ॥३॥
सकळ ही तुम्ही व्हा गे एकीसवा । तुका म्हणे जीवा धीर नाहीं ॥४॥
कर कटावरी तुळसीच्या माळा । ऐसें रूप डोळां दावीं हरी ॥१॥

# अति घाई संकटात नेई, मर्यादित ठेवा गाडीचा वेग

## रस्ते सुरक्षा सप्ताहनिमित्त क्रांती चौक ते प्रादेशिक परिवहन कार्यालय या मार्गावर प्रभातफेरी




आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** 'रस्ते सुरक्षा सप्ताह'निमित्त सकाळी क्रांती चौक ते प्रादेशिक परिवहन कार्यालय या मार्गावर आयोजित प्रभात फेरीमध्ये अँबुलन्स हेल्प रायडर्स ग्रुपचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने व उत्साहाने सहभागी झाले होते. या फेरी दरम्यान वाहतुकीचे नियम व अपघातग्रस्तांना मदत याविषयी जनजागृती करण्यात आली. अँबुलन्स हेल्प रायडर्स द्वारे 'यमराज' वेशभूषा परिधान केलेले सदस्य देवानंद मनगटे यांनी सर्व उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. वाहतुकीचे नियम पाळले नाहीत व  हलगर्जीपणामुळे अपघात झाला तर तुम्हाला यमराजांची भेट घ्यावी लागू शकते असा संदेश यामधून दिला गेला. अँबुलन्स हेल्प रायडर्स मधील सदस्यांसोबतच या प्रभातफेरी अनेक संस्थांचे सदस्य, कॉलेज विद्यार्थी, परिवहन विभागाचे व वाहतूक शाखेचे पोलीस बांधव व पदाधिकारी तसेच शहरातील जागरूक सामान्य नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे, मनीष दौंड तसेच त्यांचे सहकारी संदीप शेलार, श्रीमती पूजा वानखेडे, ऐश्वर्या कराड व वाहतूक पोलीस निरिक्षक प्रमोद कठाणे तसेच त्यांच्या समवेत परिवहन विभाग आणि वाहतूक पोलीस शाखेचे अनेक लोक यावेळी उपस्थित होते. अँब्युलन्स हेल्प रायडर्सचे मुख्य समन्वयक संदीप कुलकर्णी, भूषण कोळी, विनोद रुकर,जगदीश एरंडे, मनोज जोशी, आनंद सावदेकर, मुकेश गाडेकर, सुरेश हिंगमिरे, शारदा पडवळे, अनिता खांडेकर, प्रसाद कस्तुरे, रजनी नागवंशी व इतर अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'अति घाई संकटात नेई','मर्यादित ठेवा गाडीच वेग, नाहीतर होईल यमराजाशी भेट' अशा अनेक घोषणा देत सर्वजण मोठ्या उत्साहात यामध्ये सहभागी झाले होते.

# दावोसमधून मोठी गुंतवणूक आणल्याची सरकारची ‘बनवाबनवी’ उघड : अतुल लोंढे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दावोस येथून महाराष्ट्रात तब्बल १ लाख ३७ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार झाल्याचा दावा केला आहे. परंतु यातील काही कंपन्या या महाराष्ट्रातीलच असून महाराष्ट्रात गुंतवतणूक करण्यासाठी दावोसला जाण्याची काय गरज होती असा सवाल विचारला जात आहे. महाराष्ट्रातील तीन कंपन्यांशी करार केलेला असून शिंदे सरकारची ही बनवाबनवी उघड झाली आहे असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केला आहे. यासंदर्भात बोलताना अतुल लोंढे म्हणाले की, महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी दोवासमधील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये केलेल्या सामंजस्य करारामध्ये महाराष्ट्रातील औरंगाबाद, जालना व चंद्रपूर जिल्ह्यातील तीन कंपन्या असल्याचे उघड झाले आहे, अशा कंपन्यांची संख्या जास्त असू शकते. न्यु एज क्लिनटेक सोल्युशन कंपनी ही औरंगाबादची आहे, फेरा अलॉय प्रा, ली. ही कंपनी जालना मधील आहे तर राजुरी स्टिल अँड अलॉय इंडिया ही कंपनी चंद्रपूरची आहे. या कंपन्या अमेरिका, इंग्लंड, इस्त्राईल देशातील असल्याचे दाखवले आहे. प्रसार माध्यमात यासंदर्भातील बातम्या प्रकाशित झाल्या आहेत. भद्रावती येथे २० हजार कोटी रूपये गुंतवणुकीचा कोळसा गॅसिफिकेशन प्रकल्प उभारण्यासाठी अमेरिकेच्या न्यू एरा क्लिनटेक सोल्युशन कंपनीने सामंजस्य करार केल्याचे दाखवले असून मुख्यमंत्र्यांच्या बाजूला उभे राहून MOU ची कॉपी दाखवणारा व्यक्ती गेल्या सहा-सात वर्षांपासून रोज मंत्रालयात असतो मग करार करण्यासाठी दावोसला जायची काय गरज? इथेच मुंबईत करार करायला काही अडचण होती का ? ही महाराष्ट्राची घोर फसवणूक आहे.

**महाराष्ट्राची घोर फसवणूक :** शिंदे-फडणवीस सरकारने वेदांता-फॉक्सकॉन हा १ लाख ५८ हजार कोटी रुपये किंमतीचा व १ लाख रोजगार देणारा तळेगाव जवळ सुरु होणारा प्रकल्प गुजरातला जाऊ दिला . नागपूरमधील मिहान येथे होणारा २२ हजार कोटींचा टाटा एअर बस प्रकल्प, रायगड जिल्ह्यात होणारा ३ हजार कोटी रुपयांचा बल्क ड्रग्ज प्रकल्पासह जवळपास २ .५० लाख कोटी रुपयांची गुतवणूक व लाखो रोजगार महाराष्ट्रातून बाहेरच्या राज्यात जाऊ दिले . यावरून राज्यातील जनतेमध्ये विशेषत : तरुणांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात होता . पंतप्रधान नरेंद्र मोदी वेदांतापेक्षा मोठा प्रकल्प महाराष्ट्राला देणार आहेत अशी लोणकढी थापही त्यावेळी मारण्यात आली, पंतप्रधान मोदी देणारा तो मोठा प्रकल्प अजून तरी महाराष्ट्रात आला नाही परंतु महाराष्ट्राच्या जनतेची नाराजी दूर करून आपण मोठी गुंतवणूक आणली हे दाखवण्याच्या नादात सरकारने मात्र महाराष्ट्राची घोर फसवणूक केल्याचे उघड झाले आहे, असे लोंढे म्हणाले .



# सुजलॉन कंपनीच्या बेजबाबदारपणा विरोधात राजपूत करणी सेनेचे उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सुजलॉन पवन ऊर्जा कंपनीचा बेजबाबदार वृत्तीला बळी पडलेल्या गरीब शेतकऱ्यांसाठी राष्ट्रीय राजपूत करणी सेना तर्फे जेल रोड जवळील क्यूमाईन क्लब शेजारी आमरण उपोषण करण्यात येत आहे.

सुजलॉन पवन ऊर्जा कंपनीने अचानक पणे झालेल्या व काही गोष्टींची बेजबाबदारपणे अन्याय करण्यात येत आहे असे या ठिकाणी सांगण्यात आले. यासाठी अनेक मागण्यांसाठी उपोषण सुरू आहे मागण्या अशा आहेत की पवन ऊर्जा टॉवर उभारण्यावेळी सुझलॉन कंपनीने घेतलेल्या गावांना २४ तास वीज, पाणी सुविधा पुरविण्याचे आश्वासन दिले होते . त्यानुसार दत्तक घेतलेल्या गावांना सुविधा पुरविण्यात याव्यात,सुरुवातीला अनेक तरुणांना सुरक्षारक्षक म्हणून कंपनीच्या टॉवरच्या ठिकाणी नियुक्त केले सुरक्षारक्षकांना नियुक्ती देतांना अगोदर प्रतिज्ञापत्राच्या नावाखाली राजीनामे लिहून दिशाभूल केली . सुझलॉन कंपनीने कामावरून काढून टाकलेल्या सुरक्षारक्षकांना पुन्हा कामावर घेऊन राजीनामे मागे घेवून रिक्त ठिकाणी सुरक्षा रक्षकांची पुन्हा नियुक्ती करावी, सुरक्षारक्षकांक वन पीएफची योग्य रक्कम त्वरीत मिळावी तसेच सुरक्षा रक्षकांना गणवेशासह सुरक्षांचे विविध साहित्य पुरविण्यात यावे,सुझलॉन कंपनीने टॉवरच्या नावाखाली गोरगरीब शेतकऱ्यांच्या जमिनी बेकायदेशीरपणे बळकावल्या आहेत. तर अनेक शेतकऱ्यांच्या जमिनींची मुदत २० वर्षे करारानुसार पुर्ण होऊन त्यांना शेतजमिनी परत मिळालेल्या नाही मुदतकरार पुर्ण झालेल्या शेतकऱ्यांना जमिनी परत मिळाव्यात. उभारलेली अनेक टॉवरांची सुरक्षा वावर असल्याने चोरीच्या घटनाही वाढल्या आहेत. सुझलॉन कंपनीने पवनऊर्जा प्रकल्पाच्या स्थानिकांना रोजगार व सुविधा दिलेला शब्द पाळण्यात यावा, भारताना जमिन देणाऱ्या शेतकयांच्यातील एका व्यक्तीरूपी नोकरीवर घेण्याचे दिलेल्या आश्वासनानुसार कुटूंबातील नोकरीवर घेणे, टॉवर कामाच्या नावाखाली शेतजमींमधून माती व मुरूमचे उत्खनन करीत जमिनींची पीळ मात्र केली आहे . म्हणुन शेतजमिनीच्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना मिळावी,मोबदला न देता टॉवर लावण्यासाठी देशाताबा सुझलॉन कंपनीने केला असून सदर जमिनी योगा मोबदला देगून पुन्हा परत मिळाव्यात ,सुझलान पंकनीया टॉवरांना सम्बल १५ हून अधिक वर्ष उभारणीस झाले असून टॉवरांची योग्य ती दुरुस्ती कागदावर न करता प्रत्यक्षात करण्यात यावी, शेतातून वीज पोल गेलेल्या अनेक शेतकऱ्यांना त्या पोल लावण्याबाबतची रक्कम देण्याचे ठरल्यानुसार काही शेतकऱ्यांना रक्कम मिळालेली नाही. म्हणून सुझलॉन कंपनीने वीज पोल ला दिलेल्या शेतकऱ्यांना  अथवा त्यासाठी ठरविली रक्कम त्वरीत देण्यात यावी, स्थानिक राजकीय तरुणांसह शेतकरी ग्रामस्थांवर आजपावेतो अनेक खोटे गुन्हे दाखल केले आहेत म्हणून दाखल केलेले खोटे गुन्हे दवाखाना शिक्षणासह विविध असे विविध मागणीसाठी जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन उपोषण करण्यात येत आहे.



# पर्यावरण वाचवा, तरच माणूस वाचेल : प्रा. योगेश शर्मा

## दयानंद वाणिज्य रासेयोतर्फे 'पर्यावरण' विषयावर व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** निसर्ग आणि मानव यांच्यात अतूट नाते आहे. झाडांकडून ऑक्सिजन घेतल्याशिवाय मानव जगूच शकत नाही. पर्यावरण संरक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी असून, वृक्षांची चळवळ ही लोकचळवळ व्हायला हवी. भावी पिढीला सुरक्षित ठेवण्यासाठी वृक्ष लागवड आणि संवर्धन गरजेचे आहे, असे प्रतिपादन वसुंधरा प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.योगेश शर्मा यांनी केले. दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने लातूर तालुक्यातील सामनगाव येथे विशेष युवक शिबीर सध्या सुरू आहे. या शिबिरात 'पर्यावरण संरक्षण काळाची गरज' या विषयावर प्रा.योगेश शर्मा यांचे व्याख्यान झाले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.विशाल वर्मा तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते शिवानंद बुलबुले, प्रा. दीपक वेदे, प्रा.आमीर शेख, सह-कार्यक्रमाधिकारी प्रा.अरुणा चौधरी, प्रा.लता जाधव, प्रा.सुवर्णा कारंजे आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्रा.योगेश शर्मा म्हणाले, एक झाड वर्षाला 100 किलो ऑक्सिजन देते. शिवाय, 22 किलो कार्बन डोयॉक्साइड शोषून घेते. झाडांच्या माध्यमातून जमिनीची धूप कमी होते. शिवाय, तापमानात होणारी वाढ कमी करण्यासाठी वृक्षांची मोठी मदत होते. झाडांचे अनेक फायदे आहेत. वृक्षांची चळवळ ही लोकचळवळ होणे गरजेचे आहे. प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून झाडांचा वाढदिवस साजरा करावा, असे आवाहनही त्यांनी बोलताना केले. प्रास्ताविक रासेयो सह-कार्यक्रमाधिकारी प्रा.अक्षय पवार यांनी करून पर्यावरण संरक्षण बाबत जागरुकता निर्माण केली. अध्यक्षीय भाषणात बोलताना डॉ.विशाल वर्मा यांनी राष्ट्रीय सेवा योजना आणि सामनगाव ग्रामस्थांच्या वतीने वृक्षारोपण आणि संवर्धन कार्य हाती घेण्याचा मानस बोलून दाखवला. प्रारंभी स्वागतगीत गजानन मिश्रा या स्वयंसेवकाने सादर केले. सूत्रसंचालन सुचिता सुरवसे, नंदिनी पाटील यांनी तर आभार प्रा.श्रावण बनसोडे यांनी मानले.

**राज्यपाल.... 'ते' निवेदन अन् टाळ्यांचा कडकडाट**
वरिष्ठ महाविद्यालयात शिकणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांना पर्यावरण हा विषय अनिवार्य आहे . या विषयाअंतर्गत सर्वच विद्यापीठातील विद्यार्थ्यांना वृक्ष लागवड आणि संवर्धन अनिवार्य करावे या मागणीचे निवेदन प्रा .योगेश शर्मा यांनी महामहीम राज्यपाल यांना लातूर दौऱ्यावर आल्यानंतर दिले . राज्यपाल यांना निवेदन देण्यासाठी गेल्यानंतर राज्यपाल महोदयांनी माझ्यासारख्या अत्यंत साधारण व्यक्तीला वेळ देऊन सविस्तर चर्चा केली, असे यावेळी बोलताना प्रा .योगेश शर्मा यांनी नमूद केले . प्रा .शर्मा यांच्या प्रयत्नाने नांदेड विद्यापीठात विद्यार्थ्यांना वृक्ष लागवड आणि संवर्धन केल्याशिवाय पदवी दिली जाणार नाही . प्रा .शर्मा यांनी यावेळी हा संपूर्ण क्रम विद्यार्थ्यांना सांगितला . यावेळी टाळ्यांचा कडकडाट झाला .

नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट

महावीर
घर संसार



सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# एअर इंडियाला दंड

आधुनिक केसरी

एअर इंडियाच्या विमानात प्रवासी महिलेच्या अंगावर लघुशंका केल्याचे प्रकरण सोशल मीडिया असेल किंवा प्रसारमाध्यमे असतील सगळीकडेच गाजले होते. या प्रकरणात आता वाहतूक महासंचनलायाने एअर इंडियाला ३० लाख रूपयांचा दंड ठोठावला आहे. एवढेच नाही तर या विमानाच्या वैमिनिकाचा परवानाही तीन महिन्यांसाठी निलंबित केला आहे. DCGA नियमांचे उल्लंघन केल्या प्रकरणी एअर इंडियाला हा दंड ठोठावला आहे. विमानतल्या वैमानिकाने आपली जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडली नाही हा ठपका ठेवत त्याला तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात आले आहे. तसेच या विमानाच्या डायरेक्टरला तीन लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे. एअर इंडियाच्या विमानात महिलेच्या अंगावर लघुशंका करणारा आरोपी शंकर मिश्राला पोलिसांनी अटक केली आहे. एअर इंडियाच्या विमानातून प्रवास करण्यासाठी शंकर मिश्राला चार महिन्यांची बंदीही घालण्यात आली आहे. मागील वर्षी २६ नोव्हेंबरला एअर इंडियाच्या न्यूयॉर्क दिल्ली विमानात एका मद्यधुंद व्यक्तीने महिला प्रवाशाच्या अंगावर लघुशंका केली होती. त्यानंतर ६ डिसेंबरलाही असाच प्रकार घडला होता. यानंतर नागरी उड्डाण महासंचलनालयाने या प्रकरणी ताशेरे ओढले आहेत. सदरचा प्रकार अत्यंत किळसवाणा आहे आणि असे प्रकार विमानात घडत असतील तर ते एअर इंडियाचे अपयश आहे, असेही डीसीजीएनने म्हटले आहे. आरोपी मिश्रा याने ज्या विमानात प्रवासादरम्यान महिलेवर लघुशंका केली होती, त्याच विमानात एस भट्टाचार्जी प्रवास करत होते. त्यांनी त्यावेळी नेमके काय घडले होते, याबाबत सविस्तर सांगितले आहे. दुपारच्या जेवणानंतर ही घटना घडली. आरोपीने त्यावेळी मद्यप्राशन केलेले होते. मला आरोपी एकच प्रश्न परत-परत विचारत होता. मी दुपारचे जेवण केले. त्यानंतर आरोपीकडे लक्ष द्यावे अशी फ्लाइट अटेंडंटला विनंती केली, अशी माहिती भट्टाचार्जी यांनी दिली होती. ज्या महिलेवर आरोपीने लघुशंका केली, ती महिला सभ्य दिसत होती. आरोपीने लघुशंका केल्यानंतर दोन कनिष्ठ एअर होस्टेस तेथे होत्या. त्यांनी त्या महिलेला साफ केले. ती घटना घडल्यानंतर मी विमानातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे गेलो आणि महिलेला दुसरी जागा द्यावी, अशी विनंती केली. मात्र त्यांनी तसे करण्यास नकार दिला. महिलेची जागा बदलायची असेल तर आम्हाला विमानाच्या कॅप्टनला तसे विचारावे लागेल, असे मला त्या अधिकाऱ्यांनी सांगितले, असे भट्टाचार्जी यांनी सांगितले होते.

# कौटुंबिक राजकारण लोकशाहीच्या भावनेच्या विरुद्ध आहे



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**कौटुंबिक राजकारण किंवा घराणेशाहीचे राजकारण बहुधा लोकशाहीच्या आत्म्याविरुद्ध आहे. भारतीय लोकशाही व्यवस्थेतील अनेक राजकीय आजारांपैकी हा एक आहे, असे खेदाने म्हणावे लागत आहे. येथे काँग्रेससह जवळपास सर्वच राजकीय पक्ष उपक्रमाप्रमाणे कौटुंबिक राजकारण चालवतात. विरोधाभास असा आहे की गेल्या ७५ वर्षांत अनेक प्रादेशिक क्षत्रपद्धती उदयास आल्या आहेत.भारतातील सुमारे ५० संबंधित राजकीय पक्षांपैकी कम्युनिस्ट पक्ष वगळता इतर राजकिय पक्ष कौटुंबिक राजकारणाची पार्श्व असल्याचें दिसून येईल. अलीकडेच, भाजपच्या ४२ व्या स्थापना दिनाच्या कार्यक्रमात पंतप्रधान मोदी म्हणाले की, या देशात अजूनही दोन प्रकारचे राजकारण सुरू आहे. एक म्हणजे कौटुंबिक निष्ठेचे (घराणे) राजकारण आणि दुसरे राष्ट्रवादाला (भाजपप्रमाणे) समर्पित. गेल्या २ लोकसभा निवडणुकीत 'काँग्रेस मुक्त भारत' आणि 'भ्रष्टाचार मुक्त भारत' या दोन दोन प्रमुख घोषणा भाजपने दिल्या.**






२०२४ च्या निवडणुकीच्या प्रचाराची कथा कदाचित 'वंशवादी मुक्त भारत' असेल. त्याची थीम असेल की भाजप देशाला समर्पित आहे, तर इतर पक्ष 'कुटुंबासाठी समर्पित' आहेत. या कथनात प्रादेशिक पक्षांचाही समावेश आहे, जे बहुतेक कुटुंबाभिमुख आहेत.

भाजपला आता कळून चुकले आहे की अनेक राज्यांमध्ये घराणेशाही असलेल्या प्रादेशिक पक्षांनाच खरा धोका आहे. काँग्रेस घराणेशाहीला बाजूला केल्यानंतर, पक्षाने ८ प्रमुख कुटुंबे ओळखली आहेत जी देशभरातील राज्य राजकारणावर वर्चस्व गाजवतात आणि त्यांना राजकीयदृष्ट्या नष्ट करण्याचा विचार करतात. तेलंगणा, मेघालय, नागालँड, त्रिपुरा, कर्नाटक, छत्तीसगड, मध्य प्रदेश, मिझोराम आणि राजस्थानमध्ये २०२३मध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत.

भाजपने पाहिलेल्या घराणेशाहीचा अंत करणे शक्य आहे का ? काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत अब्दुल्लांसारखी अनेक घराणेशाही आहेत. काश्मीरमध्ये मुफ्ती, पंजाबमध्ये बादल आणि कॅप्टन अमरिंदर सिंग, राजस्थान आणि मध्य प्रदेशात राजे आणि पायलट आणि उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये यादव हे असे कुटुंबवादी आहेत. ओडिशात पटनायक, कर्नाटकात गौडा आणि बोम्मई, आसाममध्ये गोगोई, तमिळनाडूमध्ये करुणानिधी, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशमध्ये राव आणि रेड्डी, झारखंडमध्ये सोरेन आणि हरियाणात चौटाला आणि हुड्डा. इत्यादी.

दक्षिणेकडील राज्ये सध्या प्रादेशिक क्षत्रपांच्या छत्राखाली आहेत - तेलंगणा राष्ट्र समितीचे के. चंद्रशेखर राव, आंध्र प्रदेशातील वाय.एस. जगनमोहन रेड्डी, तामिळनाडूतील एम.के. केरळमध्ये स्टॅलिन आणि पिनाराई विजयन. आपल्या आगामी प्रकल्पांतर्गत या चौघांनाही कमकुवत करण्याचा भाजपचा डोळा आहे. पक्षाचे सध्या तामिळनाडूमध्ये (जे AIADMK चे बालेकिल्ले आहेत) फक्त ४आमदार आहेत आणि आंध्र प्रदेश आणि केरळमध्ये एकही आमदार नाही. तेलंगणात ३ आमदार स्वबळावर राहतात. त्यामुळे पहिली पायरी त्यांना कमकुवत करणे असेल. दक्षिणमध्ये ५ राज्यांमध्ये १२० जागा आहेत. सर्व प्रयत्न करूनही कर्नाटक वगळता दक्षिणेकडील राज्यांवर पक्षाला पकड मिळवता आली नाही.

आता प्रश्न पडतो की या घराण्यातील नेत्यांचा जनतेवर प्रभाव का? कुटुंबावर आधारित पक्ष त्यांची मुलं किंवा मुली किंवा जवळच्या नातेवाईकांना त्यांचे उत्तराधिकारी म्हणून निवडतात कारण त्यांना वाटते की ते जबादारी पेक्षा अधिक संपत्तीसारखे आहेत. अशा प्रकारचा वंशवाद चालविल्याने त्यांच्या निधनानंतर सत्ता स्वीकारण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देणे सोपे जाते. दुसरे म्हणजे, नवीन उमेदवारांपेक्षा कौटुंबिक उमेदवार निवडून येण्याची अधिक शक्यता असते. तिसरे, काही प्रादेशिक क्षत्रपांच्या लक्षात आले की कौटुंबिक सत्ता स्थापन केल्याने त्यांना निष्ठा आणि विश्वास मिळू शकतो. द्रमुकसारख्या पक्षानेही करुणानिधींच्या घराणेशाहीला तोंड देण्यासाठी स्वतःला संघटित केले आहे. दुसरीकडे भाजप आणि इतरांचा असा विश्वास आहे की लोकशाहीमध्ये घराणेशाहीचे राजकारण चांगले नाही. कारण ते केवळ घराणेशाही कुटुंबातील मजबूत संबंध असलेल्या नेत्यांना यशस्वी होण्यास सक्षम करत असते.

भाजपही कुटुंबवादाच्या राजकारणापासून अस्पर्शित नाही. मोदी सरकारमधील सर्व कॅबिनेट मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया, पियुष गोयल, धर्मेंद्र प्रधान, अनुराग ठाकूर आणि किरेन रिजिजू यांसारख्या घराण्यांना ते लागू होत नसल्याचे टीकाकारांचे म्हणणे आहे. कर्नाटकच्या बसवराज बोम्मई किंवा अरुणाचल प्रदेशच्या पेमा खांडूसारख्या भाजपच्या मुख्यमंत्र्यांनाही ते लागू होऊ शकत नाही. राजकीय घराणेशाहीच्या अंताची अपेक्षा करणे कदाचित अभिमानास्पद असेल, कारण लोक अजूनही त्यांच्याशी संलग्न आहेत म्हणून यास थोडा वेळ लागेल. सध्याच्या नेत्यांना त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना त्यांचे राजकीय उत्तराधिकारी म्हणून प्रोजेक्ट करण्यात लाज वाटत नाही. भाजपला घराणेशाही किंवा घराणेशाहीमुक्त भारत हवा असला, तरी जोपर्यंत सर्व राजकिय पक्ष आणि मतदार ठरविणार नाही तोपर्यंत नव नेतृत्व उदयास येईल असे म्हणता येणार नाही.

# खरंच आपण कुठे चाललोय...?



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**कोणी म्हणतात की, माणसाचा सर्वात चांगला जीवन आहे तर.. कोणी म्हणतात मला माणसाचा जन्म मिळाला नसता तर बरं झालं असतं, कोणी म्हणतात मानवी जन्मात खूप दुःख सहन करावे लागतात, कोणी म्हणतात जीवन जगण्याची इच्छाच राहिली नाही.या भल्या मोठया जगामध्ये लाखो, करोड लोकसंख्या आहे तसच प्रत्येकांचे विचार सुद्धा वेगवेगळ्या प्रकारचे आहेत. कोणाकोणाचे विचार ऐकावे अन् कोणाचे नाही असच सदैव वाटत असते असो, हा ज्यांचा, त्यांचा प्रश्न आहे उगाचच कोणाला नाव ठेवणे योग्य नाही. आजचा लेखाचा विषय "खरच आपण कुठे चाललोय". .? आहे पण नेमकं आपण खरच कुठे चाललोय हा एक भारी मोठा प्रश्नच आहे.**

कधी, कधी ह्या गोष्टीबद्दल आपल्याला प्रश्न सुध्दा पडत असतो कारण, जीवन जगत असतांना या प्रवासात अनेक लोक भेटत असतात तसच अनेक वाटा सुद्धा समोर असतात नेमकं कोणत्या वाटेने आपल्याला चालत जायचं आहे हेच कधी, कधी कळत नाही व वेळेवर सुचत सुद्धा नाही. त्यामुळे आपल्यासाठी जी वाट योग्य असते ती चुकून जाते मग उशीरा लक्षात आल्यावर पश्चतापात पडण्याची पाळी येत असते अशी आपल्यावर पुन्हा वेळ येऊ नये यासाठी योग्य वाट निवडण्याची गरज आहे.

उदा.एखाद्या वेळी, आपल्याला गावी जायचं असेल तर आपण कधीच तो मार्ग चुकत नाही एसटी बसने असो किंवा गाडीने, सायकलने, विमानाने व बैलगाडीने प्रवास करताना योग्य ठिकाणी पोहचत असतो पण, जेव्हा, आपल्या जीवनाचे सार्थक करण्याची शुभ संधी मिळते त्यावेळी मात्र आपण ती, संधी सोडून नको त्या भलत्याच वाटेवर चालण्याची सवय लावून घेतो त्यामुळे आपल्या संपूर्ण जीवनात असंख्य संकटाचा सामना करता,करता निघून जाते याला जबाबदार स्वतः आपणच असतो.म्हणून अशा प्रकारच्या वाटेवर चालणे सोडून दिलेले एकवेळचे बरे..!

आज विज्ञानाचा युग आलेला आहे ह्या, विज्ञानाच्या साह्याने आपण खूप दूर निघून गेलेलो आहोत ,येशाच्या शिखरावर पोहोचलो आहोत पण,तेवढेच खाली सुद्धा आलेले आहोत यात विज्ञानाचा काय दोष. . ?एका अर्थाने टी,व्ही,मोबाईल किंवा इतर मनोरंजनाचे साधन आहेत तेवढेच त्यातून खूप काही शिकायला मिळत असते, आपले कामही पटपट होऊन जातात हे, सर्व फायदेशीर आहेत पण, त्यांचाच दुरूपयोग केल्याने वाईट परिणाम मनावर होत असतात त्याला जबाबदार स्वतः आपण असतो ते, साधन नाही.

आज याच समाजामध्ये काही महिला, पुरुष सुशिक्षित सुध्दा आहेत पण ते उच्च शिक्षित असून सुद्धा नको, त्या वाटेवर चालत आहेत सर्वाच जास्त यामध्ये महिलांचा सहभाग आहे याचे खरे कारण म्हणजेच त्या सुशिक्षित असून सुद्धा अंधश्रद्धेच्या आहारी जात आहेत याच अशा वाईट व व्यर्थ सवयीमुळे आजपर्यंत अनेक महिला स्वतः दुःखाचे कारण बणलेले आहेत त्यामुळे त्यांचा पाहिजे त्या प्रमाणात विकास होत नाही पुढे त्या शिक्षित असूनही अशा वागत राहिल्या तर त्यांच्या उच्च शिक्षण घेण्याला काय अर्थ. . ? त्याच प्रमाणे दुसरी गोष्ट ती, म्हणजेच यात पुरुष वर्ग सुध्दा मागे नाहीत स्वतः सुशिक्षित असतानाही भोंदूबाबांवर विश्वास करतात घरी आजारी असलेल्या बहिणीला, आईला, बायकोला दवाखान्यात न्यायचं सोडून भोंदूबाबांकडे घेऊन जातात मग एक दिवस त्यांचेही होणारे परिणाम भोगावे लागतात अशा विचारी लोकांना खरच काय म्हणावे...? जेथे जायला पाहिजे तेथे जात नाही नको त्या संगतीत व फसव्या गोड, गोड शब्दात बोलणाऱ्या लोकांची संगत करून सोन्यासारख्या जीवनाची माती करून घेतात व उशीर जाग आल्यावर आसरा शोधण्यासाठी इकडे, तिकडे शोधत फिरतात त्यावेळी कोणीही जवळ करत नाही हे वास्तव सत्य आहे.

जीवनाचे दुसरे नाव जरी संघर्ष असले तरी तोच संघर्ष जीवनाला गती देत असतो .त्या संघर्षाला कंटाळून जाऊ नये. आपल्या मनातील वाईट विकारांना काढून टाकावे ,नेहमीच सत्याच्या वाटेवर चालत रहावे, भृणहत्या करून पाप करू नये,खोटे तर मुळात बोलूच नये,हुंड्याच्या लालसेपोटी एखाद्या निरपराध महिलेचा छळ करू नये, प्रसिद्धी मिळविण्यासाठी आपला स्वाभिमान विकू नये, आपल्याला चांगल्या ठिकाणी पोहचायचे असेल तर चांगल्याच माणसाची संगत धरावी, चांगले विचार आत्मसात करून नव्याने जगायला सुरवात करावे तेव्हाच कुठेतरी जीवन जगण्याचा खरा आनंद मिळेल आणि अर्थही लागेल. ..नाहीतर आपल्याकडे कितीही काही असेल तरी सारं काही व्यर्थ आहे. आपण आजच्या घडीला चाललोय कुठे. .? या विषयी आपणच आपले परीक्षक बनून आत्मपरीक्षण केले पाहिजे नक्की च त्यातून खूप काही शिकायला मिळेल आणि आज ही शोधण्याची काळाची गरज आहे. तेव्हाच खरा व योग्य मार्ग सापडेल...

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# खेड्यांतील आरोग्य सेवा कधी सुधारणार ?



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**गावागावात आरोग्य सुविधा आणि डॉक्टर नसल्यामुळे उपचाराअभावी दररोज हजारो लोकांचा अकाली मृत्यू होतो. केंद्र आणि राज्य सरकारच्या चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे दावे प्रत्यक्षात कुठेच दिसत नाहीत. हां, गेल्या काही वर्षांत काही सुधारणा झाल्या आहेत खऱ्या, पण समाधानकारक मानल्या जाव्यात तेवढ्या नाहीत. महत्त्वाचे म्हणजे आजही देशातील सात लाख गावांमध्ये आरोग्य सुविधांची तीव्र टंचाई आहे, शिवाय डॉक्टरांची नियुक्तीही आवश्यकतेपेक्षा खूपच कमी आहे.**

तामिळनाडू हे एकमेव राज्य आहे जिथल्या खेड्यांमध्ये आरोग्य सेवा समाधानकारक आहेत, असे म्हणता येईल. खेड्यांमध्ये डॉक्टरांची कमतरता भरून काढण्यासाठी राज्यांनी काही वर्षांपूर्वी कठोर कायदे केले होते, पण तरीही बहुतेक नवीन डॉक्टर खेड्यात सेवा द्यायला नकार देतात. गंमत अशी आहे की, नोकरीसाठी भरलेले हमीपत्र मोडून डॉक्टर दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा दंड भरतात, पण खेड्यापाड्यात सेवा देण्यास नकार देतात.

विशेष म्हणजे देशातील केवळ 20 टक्के डॉक्टर ग्रामीण भागात कार्यरत आहेत. त्यामुळे गावोगावी डॉक्टरांची उपलब्धता नाममात्र राहिली आहे. याबाबतचा कोणताही नकाशा सरकारकडे नसल्याचे कारण असल्याचे मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाचे म्हणणे आहे. दुसरीकडे, इंडियन मेडिकल असोसिएशनचे असेही म्हणणे आहे की प्राथमिक आरोग्य केंद्र आणि सीएचसीमध्ये सुविधा उपलब्ध नसल्यामुळे डॉक्टर मंडळी गावांमध्ये जायला तयार नाहीत. खेड्यापाड्यात ऑपरेशन थिएटर, भूल देणारे डॉक्टर, पॅथॉलॉजिस्ट आणि तंत्रज्ञ यांची तीव्र कमतरता आहे. याशिवाय गावोगावी आरोग्य केंद्रांवर तैनात असलेल्या डॉक्टरांसाठी निवास व आवश्यक फर्निचरची वानवा आहे. डॉक्टर खेडेगावात जात नसल्याची जी काही कारणे आहेत, ती डॉक्टरांच्या संघटनांनी दिली आहेत, मात्र याकडे राज्य सरकारे लक्ष देताना दिसत नाहीत. खेड्यापाड्यात उत्तम आरोग्य सेवा मिळत नसल्याच्या कारणाला आम्ही जबाबदार नाही, असे डॉक्टरांच्या संघटनांचे म्हणणे आहे, उलट सरकारची धोरणेच अशी आहेत की, त्यामुळे उच्च पदव्या असलेले डॉक्टर खेड्यात सेवा देण्यास तयार नाहीत. आणखी एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे ती म्हणजे सरकारी धोरणांच्या विरोधात डॉक्टरांच्या संघटना रस्त्यावर उतरताना दिसतात, पण खेड्यापाड्यातील आरोग्य सुविधा आणि डॉक्टरांची तीव्र कमतरता दूर करू शकेल असा कोणताही निर्णय राज्य सरकारे घेऊ शकत नाहीत.

आपल्याकडे तज्ज्ञ डॉक्टरांची तर वानवाच आहे. देशातील महाराष्ट्रासह 34 पैकी 25 राज्ये, केंद्रशासित प्रदेशांतील ग्रामीण शासकीय रुग्णालयांत 70 टक्क्यांवर तज्ज्ञ डॉक्टरांचा तुटवडा आहे. या राज्यांतील ग्रामीण भागांत सर्जन, महिला, बालरोगसह तज्ज्ञ डॉक्टरांचा मोठा तुटवडा आहे. ग्रामीण आरोग्य सांख्यिकी अहवाल 2021-22 च्या अहवालातून ही धक्कादायक माहिती समोर आली आहे. ग्रामीण आरोग्य सेवेत मध्य प्रदेशची स्थिती देशात सर्वात वाईट आहे. येथे विषयतज्ज्ञ डॉक्टरांची 95 टक्के पदे रिक्त आहेत. गुजरातमध्ये 90 टक्के, राजस्थानमध्ये 79 टक्के, उत्तर प्रदेशात 72 टक्के, बिहारमध्ये 70 टक्के महाराष्ट्रात 70 टक्के तज्ज्ञ डॉक्टरांची पदे रिक्त आहेत. केरळमध्ये 94.31 टक्के, पश्चिम बंगालमध्ये 93.3 टक्के, व तामिळनाडूत 83.83 टक्के, तज्ज्ञ डॉक्टरांची पदे रिक्त आहेत. मिझोराम, सिक्कीम, ग्रामीण दीव-दमण, पुद्दुचेरीत एकही तज्ज्ञ डॉक्टर नियुक्त नाही.



चीनच्या तुलनेत भारतामध्ये ग्रामीण भागातील 3,100 रुग्णांमागे फक्त एक बेड आहे. बिहारमध्ये 18,000 गावकऱ्यांसाठी एक बेड, उत्तर प्रदेशमध्ये 3,900 रुग्णांसाठी एक बेड आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात दर 26,000 लोकसंख्येमागे एक ॲलोपॅथी डॉक्टर आहे, मात्र जागतिक आरोग्य संघटनेचे म्हणणे आहे की दर 1,000 लोकसंख्येमागे एक डॉक्टर असावा. सुमारे दहा हजार लोकसंख्येसाठी भारतात सात डॉक्टर्स आहेत. मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया (एमसीआय) मध्ये नोंदणीकृत ॲलोपॅथिक डॉक्टरांची एकूण संख्या सुमारे एक कोटी आहे. डॉक्टरांच्या उपलब्धतेच्या बाबतीत पश्चिम बंगालमध्ये अन्य राज्यांच्या तुलनेत सर्वात वाईट परिस्थिती आहे. नॅशनल हेल्थ प्रोफाईलनुसार, पश्चिम बंगालच्या ग्रामीण भागात फक्त 900 डॉक्टर आहेत. लोकसंख्येनुसार, 70,000 लोकांमागे एक डॉक्टर आहे. बिहार आणि झारखंडमध्ये 50,000 लोकसंख्येमागे एकच डॉक्टर आहे. विशेष म्हणजे ग्रामीण आरोग्य सेवेचा पाया प्राथमिक आरोग्य केंद्रांवर टिकून आहे, पण हा पायाच खूप कमकुवत आहे.

आज देशात केवळ सात लाख एमबीबीएस डॉक्टर सेवा देण्यासाठी उपलब्ध आहेत.अशा स्थितीत पाच लाख डॉक्टर आणि पाच लाख तज्ज्ञांची कमतरता कशी भरून काढायची हा मोठा प्रश्न आहे. ही कमतरता भरून काढण्यासाठी केंद्र सरकारने काही पावले उचलली आहेत. यामध्ये केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या 'ई-संजीवनी मेडिसिन' सेवेने तीन कोटी टेलि-कन्सल्टेशनचा आकडा पार केला आहे. यासह 'ई-संजीवनी टेलिमेडिसिन'ने एका दिवसात 1.7 लाख सल्लामसलत करण्याचा नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. आरोग्य मंत्रालयाने कोरोनाच्या वेळी प्रत्येक गावात उपचारासाठी फिरती दवाखाना व्हॅन उपलब्ध करून दिली होती. याचा देशाच्या ग्रामीण भागातील लोकांना मोठा फायदा झाला. आयुष्मान भारत योजनेमुळे अत्यंत गरीब असलेल्या लोकांची चिंता काही प्रमाणात दूर झाली आहे, पण आरोग्य सेवा आणि डॉक्टरांच्या कमतरतेमुळे निर्माण होणाऱ्या समस्या दूर करता येतील का, हा प्रश्नच आहे.

डॉक्टरांच्या कमतरतेमुळे गावकऱ्यांना बनावट डॉक्टरांची सेवा घ्यावी लागत आहे. यामुळे हजारो लोक चांगल्या उपचाराअभावी अकाली मृत्यूमुखी पडतात. ॲलोपॅथीशिवाय खेड्यापाड्यात होमिओपॅथी आणि आयुर्वेदिक डॉक्टरांची कमतरता असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. आयुर्वेद आणि योगाच्या प्रचारासाठी केंद्र सरकार दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी देते. मात्र सेवा देण्यासाठी पात्र डॉक्टरांची कमतरता आहे. त्यामुळे एमबीबीएस व्यतिरिक्त बीएमएस आणि आयुर्वेदिक डॉक्टरांची मोठ्या प्रमाणावर भरती करण्याची गरज आहे. गावपातळीवर होमिओपॅथी आणि आयुर्वेदिक आरोग्य केंद्रांच्या अभावावर तातडीने पावले उचलली, तर खेड्यात डॉक्टरांची कमतरता असतानाही लोकांचे प्राण वाचू शकतात.

देशातील एमबीबीएस डॉक्टरांची कमतरता पूर्ण करण्यासाठी तज्ञांनी काही सूचना दिल्या आहेत. यामध्ये 'फॅमिली मेडिसिन', 'डिप्लोमा इन जनरल मेडिसिन' आणि ग्रामीण आरोग्य सेवेतील पदवीचा समावेश आहे. या तीन सूचनांवर प्रभावीपणे पुढे गेल्यास खेड्यापाड्यातील डॉक्टरांची कमतरता मोठ्या प्रमाणावर दूर करता येईल. परंतु डॉक्टरांना चांगले पगार आणि सुविधा उपलब्ध करून दिल्यास शिक्षण पूर्ण करून परदेशात जाणाऱ्या डॉक्टरांना आपोआप अटकाव येऊ शकेल.केंद्रीय आरोग्य मंत्रालय वर्षानुवर्षे गावांमध्ये आरोग्य सेवांच्या अभावाची समस्या सोडवण्यासाठी व्यावहारिक पाऊल उचलण्याची सातत्याने चर्चा करत आली आहे. हे सूत्र आहे, 'एमबीबीएस'चा पाच वर्षांचा अभ्यास पूर्ण केल्यानंतर, विद्यार्थ्यांना एक वर्षाचा स्पेशलायझेशन कोर्स द्यायला हवा, जेणेकरुन ग्रामीण भागात त्यांच्या तैनातीनंतर अशा डॉक्टरांना बिनदिक्कतपणे ग्रामीण भागात त्यांची चांगली सेवा देता येईल, पण यावर पुढे अंमलबजावणी होताना दिसत नाही.

त्यानंतर आता केंद्र सरकारने दुसरा फॉर्म्युला तयार केला आहे. या अंतर्गत, एमबीबीएस पदवी असलेल्या डॉक्टरांना मास्टर्स म्हणजेच एमएस किंवा एमडीमध्ये प्रवेश तेव्हाच मिळेल जेव्हा ते गावांमध्ये पोस्टिंगच्या अनिवार्य कालावधीसाठी शपथपत्र लिहून देतील. त्यात सरकारने आणखी एक गोष्ट जोडली आहे की, जे एमबीबीएस पदवीधर विद्यार्थी प्रतिज्ञापत्र देतील, त्यांचे गुण कमी असले तरी त्यांना एमएस किंवा एमडीला प्रवेश दिला जाईल. मात्र केंद्र सरकारच्या या भुरळ पाडणाऱ्या फॉर्म्युल्यानंतरही गावोगावी सेवा देणाऱ्या डॉक्टरांमध्ये विशेष आस्था दिसून येत नाही. अशा स्थितीत आता प्रश्न असा पडतो की, एवढ्या कसरती करूनही एमबीबीएस डॉक्टरांना खेड्यापाड्यात सेवा देण्यात स्वारस्य नसताना, ग्रामीण भागातील दुरवस्था असलेल्या आरोग्य सेवा सुधारण्यासाठी कोणते सूत्र अवलंबले जाणार ? 'फॅमिली मेडिसिन' अभ्यासक्रमाच्या माध्यमातून गावागावांतील डॉक्टरांची कमतरता दूर करण्यात केंद्र सरकार कितपत यशस्वी ठरते, हे सांगणे कठीण आहे. मात्र हे सूत्र प्रभावी ठरले तर खेड्यापाड्यातील आरोग्य सेवेतील डॉक्टरांची कमतरता बऱ्याच अंशी आटोक्यात येऊ शकते. पण एवढी सर्व सूत्रे घेऊनही खेड्यापाड्यातील आरोग्य सेवा सुधारली नाही, तर काय करणार ?

# देशातील विषमता नष्ट करण्याची गरज



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**देशातील एक टक्का श्रीमंतांकडे देशाची 40 टक्के संपत्ती आहे. यामुळेच देशात अनेक समस्यांचा अंबार उभा असल्याचे आपल्याला दिसुन येते.भारतातील एक टक्का श्रीमंत व्यक्तींकडे देशातील एकूण संपत्तीपैकी 40 टक्के संपत्ती आहे. तर तळागाळातील निम्म्या लोकसंख्येकडे एकूण संपत्तीपैकी फक्त तीन टक्केच संपत्ती असल्याचे ऑक्सफामच्या अहवालातून समोर आले आहे.यामुळेच भारतात आपल्याला आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात दिसून येते आणि यामुळेच गरीब हा गरीबीच्या खाईत मरत आहे तर श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होतांना दिसतो. ही बाब ऑक्सफामच्या अहवालातून स्पष्ट होते. ही माहिती ऑक्सफाम आंतरराष्ट्रीय संस्थेने दिनांक 16 जानेवारी 2023 ला आपल्या अहवालात सादर केली आहे. भारतातील 50 टक्के लोकसंख्येकडे एकूण संपत्तीच्या केवळ 3 टक्के वाटा उरल्याचेही ऑक्सफामने उजेडात आणले आहे. यामुळे देशातील गरीब व सर्वसामान्य दृष्टचक्रात अडकले आहेत.त्यामुळेच श्रीमंत लोकांचे अस्तित्व निश्चित होत आहे.**

कारण गरिब व सर्वसामान्य वर्ग अधिक कर भरत असुन, श्रीमंतांच्या तुलनेत आवश्यक वस्तू व सेवांवर अधिक खर्च करीत आहे.तरीही गरीब वर्ग हा गरीबीच्या खाईत गुदमरत आहे.या उलट श्रीमंत वर्ग दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे.सर्वसामान्य, गरिब, वंचित, आदिवासी,दलित, असंघटित क्षेत्रातील श्रमिक हा वर्ग कराच्या माध्यमातून सरकारची तिजोरी भरत असतो.परंतु देशातील एक टक्का श्रीमंतांनी देशाची 40 टक्के संपत्ती एकवटल्यानेच देशात बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते."सव्हायव्हल ऑफ रिचेस्ट" नावाचा अहवाल "ऑक्सफाम इंटरनॅशनल" या संघटनेने प्रसिद्ध केला.यात हेही म्हटले आहे की वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या दावोसमध्ये होत असलेल्या वार्षिक बैठकीच्या पाश्वभूमीवर हा अहवाल सादर करण्यात आला आहे.त्यामध्ये देशातील एक टक्का श्रीमंत व्यक्तींकडे 40 टक्के संपत्ती असल्याचे म्हटले आहेच.याशिवाय भारतातील पहिल्या 10 श्रीमंत व्यक्तींकडे देशातील 5 टक्के संपत्ती असल्याचेही या अहवालात म्हटले आहे. देशातील पहिल्या 100 अब्जाधीशांवर अडीच टक्के किंवा पाच टक्के कर आकारल्यास त्या रकमेतून देशातील महागाई, शिक्षण, गरीबी कमी करणे व इतर कामे शक्य होऊ शकते.देशात अब्जाधीशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने गरीब व सर्वसामान्य वर्ग गुदमरत आहे.भारतातील अब्जाधीशांची संख्या 2020 मध्ये 102 वरून 2022 मध्ये 166 पर्यंत वाढल्याचे अहवालात म्हटले आहे. म्हणजेच देशात दिवसेंदिवस अब्जाधीशांची व धनकुबेरांची संख्या वाढत आहे यामुळेच भारताला अनेक कठीणाईचा सामना करावा लागतो आहे. अहवालात हेही म्हटले आहे की अब्जाधीश गौतम अदानी यांच्या 2017 ते 2021 या कालावधीतील कराच्या रकमेतून सुमारे 1 लाख 79 हजार कोटी उभे राहू शकतात.त्यातुन अनेक कामे होवू शकतात. भारतातील अब्जाधीशांच्या संपूर्ण संपत्तीवर एकदाच 2 टक्के कर आकारला तर देशात 40 हजार 423 कोटी रुपये उभे रहातील.त्यातुन आपल्याला अनेक अति आवश्यक कामे करता येवू शकते.त्यामुळे देशातील विषमता दूर होण्यास मोठी मदत होईल.सरकारने देशाच्या उन्नतीसाठी व गरीबांच्या उत्थानासाठी अब्जाधीशांवर दोन ते पाच टक्के कर लावणे अत्यंत गरजेचे आहे.यामुळे सरकारच्या तिजोरीत करोडो रुपये येतील व देशातील गरीबीची खाई कमी होण्यास मोठी मदत होईल हे कार्य देशातील धनकुबेरच करू शकतात. त्यामुळे श्रीमंतांनी आपल्या जवळ असलेल्या संपत्तीवर 2 ते 5 टक्के कर सरकारी तिजोरीत जमा केला पाहिजे असे ऑक्सफामच्या अहवालात म्हटले आहे आणि मलाही वाटते देशातील धनकुबेरामुळे देश अवश्य सुजलाम सुफलाम होईल यात दुमत नाही. भारत हा 130 कोटी लोकसंख्येचा देश आहे.त्यामुळे मुठभर श्रीमंतांकडे देशाची 40 टक्के संपत्ती असने लोकसंख्येच्या दृष्टीकोनातून चिंतेचा विषय आहे.यामुळे देशाच्या प्रगतीत अडथळा निर्माण होतो.गरीब व सर्वसामान्य वर्ग हा इमानदारीने संपूर्ण टॅक्स भरत असतो.परंतु श्रीमंत वर्ग खरोखरच संपूर्ण टॅक्स भरतात काय याचाही विचार सरकारने करणे गरजेचे आहे.जगातील एक टक्का श्रीमंत व्यक्तींनी गेल्या दोन वर्षांत जगातील इतर लोकसंख्येच्या तुलनेत जवळपास दुप्पट संपत्ती मिळविली आहे. जगातील अब्जाधीशांची संपत्ती दररोज 2.7 अब्ज डॉलरने वाढत आहे.म्हणजेच जगातील सर्वात श्रीमंत 1 टक्का धनकुबेरांनी नव्याने निर्माण झालेल्या संपत्तीपैकी निम्मी संपत्ती हस्तगत केल्याचे ऑक्सफामने म्हटले आहे.



# हळदी कुंकू कार्यक्रमाचे राजकीयीकरण

आधुनिक केसरी

महिलांचा हळदी कुंकू समारंभ हा आपल्या संस्कृतीचा एक भाग आहे. विशेषतः मकर संक्रांतीनंतर हळदी कुंकू समारंभ मोठ्या प्रमाणात आयोजित केले जातात. या निमित्ताने महिला आपले दुःख विसरून एकत्र येतात. वान म्हणून एकमेकांना भेटवस्तू देतात. या निमित्ताने विविध सामाजिक संदेश दिला जातो. पण हल्ली हळदी कुंकू समारंभ देखील इतर सणांप्रमाणेच इव्हेंट बनला आहे. अलीकडे तर या सार्वजनिक हळदी कुंकू समारंभाचे पेवच फुटले आहे. विशेषतः यातले ९० टक्के हळदी कुंकू समारंभ हे राजकीय स्वरुपाचे किंवा त्या हेतूने प्रेरित असल्याचे दिसून येते. ज्या शहरात किंवा गावात निवडणुका असतात तिथे तर हे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात आयोजित केले जातात. स्थानिक नगरसेवक, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य असे कार्यक्रम करण्यात अग्रेसर असतात. यावर्षी तर पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिकांच्या निवडणुका आहेत त्यामुळे प्रत्येक गावात आणि शहरात हळदी कुंकू समारंभ आयोजित केले जात आहेत. या निमित्ताने उपस्थित महिलांना भेटवस्तूंचे वाटप राजकिय नेते करत आहेत. हळदी कुंकू समारंभ हे एकप्रकारे राजकीय शक्तिप्रदर्शनाचे आणि प्रचाराचे माध्यम बनत आहे. राजकीय नेत्यांनी आयोजित केलेले हळदी कुंकू समारंभ हे महिला मतदारांना आपल्या पक्षाकडे वळवण्यासाठी आयोजित केले जातात. एरव्ही या महिलांना कोणी विचारतही नाही. आज ज्याप्रमाणे राजकीय नेत्यांनी दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्र उत्सव यासारख्या सार्वजनिक उत्सवात अतिक्रमण करून या उत्सवांचा इव्हेंट बनवला आहे. त्याचीच पुनरावृत्ती हळदी कुंकू समारंभात होताना दिसत आहे. निखळ, कौटुंबिक आणि सांस्कृतिक स्वरूपातील या कार्यक्रमाचा नवरात्र, गणेशोत्सव व नवरात्र उत्सव यासारखा राजकीय आणि बाजारू वापर केला जात आहे. राजकीय नेते यातून आपला राजकीय मतलब साध्य करण्याचा प्रयत्न करत आहेत. राजकीय नेत्यांनी महिला मतदारांना आपल्या पक्षाकडे वळवण्यासाठी हळदी कुंकू समारंभाचा वापर करण्याऐवजी महिलांचे प्रश्न सोडवावेत म्हणजे राजकीय नेत्यांना अशा सार्वजनिक कार्यक्रमाचा वापर करण्याची गरज पडणार नाही आणि हळदी कुंकू सारख्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे अवमूल्यन देखील होणार नाही.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# संभोगातून समाधीकडे- ही कोणाची व्याख्यानमाला ?




श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**ओशो हे भारतीय गूढवादी, गुरू आणि आध्यात्मिक शिक्षक होते. चंद्र मोहन जैन असे जन्मनाव असणारे, सन १९६०पासून आचार्य रजनीश म्हणून, सन १९७० व १९८०च्या दशकांमध्ये भगवान श्री रजनीश आणि सन १९८९पासून ओशो म्हणून ओळखले जाणारे ओशो हे आंतरराष्ट्रीय अनुयायी मिळवणारे महान संत होत. तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक असणाऱ्या ओशोंनी सन १९६०च्या दशकात सार्वजनिक वक्ते म्हणून भारतभर प्रवास केला. समाजवाद, महात्मा गांधी आणि संस्थात्मक धर्मांवर उघड टीका केल्याने ते वादग्रस्त ठरले होते. लैंगिकतेसंबंधी अधिक उदारवृत्ती स्वीकारण्याच्या त्यांच्या आग्रहामुळे त्यांना आधी भारतीय आणि नंतर आंतरराष्ट्रीय माध्यमांमध्ये सेक्स गुरू अशी उपाधी मिळाली.**

सन १९७०मध्ये काही काळासाठी ते मुंबईत थांबले. तेथे त्यांनी शिष्य जमविण्यास, नवसंन्यासी आणि आध्यात्मिक शिक्षक म्हणून भूमिका बजाविण्यास सुरुवात केली. आपल्या व्याख्यानांमध्ये त्यांनी धार्मिक परंपरांमधील लिखाणे, गूढवाद्यांचे लेखन व जगभरातील तत्त्वज्ञांच्या लिखाणाचे पुनरार्थबोधन केले. पुण्यात जाऊन १९७४मध्ये त्यांनी आश्रम स्थापला. अनेक पाश्चात्त्य लोक या आश्रमामध्ये येऊ लागले. या आश्रमात ह्युमन पोटेन्शियल मूव्हमेन्टवर आधारलेल्या उपचारपद्धती पाश्चात्त्य पाहुण्यांना दिल्या जाऊ लागल्या. मुख्यतः मुक्त वातावरण व ओशोंच्या सडेतोड व्याख्यानांमुळे देश-परदेशांत हा आश्रम गाजू लागला. सत्तरच्या दशकाच्या अखेरीस भारत सरकार, सभोवतालचा समाज व आश्रम यांच्यामध्ये ताणतणाव निर्माण झाले होते. सविस्तर माहिती वाचा, अलककार- श्री कृष्णकुमार निकोडे गुरुजींच्या |ा लेखातून.

मध्यप्रदेश राज्यातील रायसेन जिल्ह्यात असलेल्या कुचवाडा नावाच्या खेड्यात- आईच्या आजोळी तारणपंथी



जैन कुटुंबात दि.११ डिसेंबर १९३१ रोजी चंद्र मोहन जैन ऊर्फ ओशो यांचा जन्म झाला. त्यांचे वडील बाबुलाल जैन हे कापडाचे व्यापारी होते. ओशोंनंतर त्यांना आणखी दहा अपत्ये झाली. ओशोंच्या आईचे नाव सरस्वती होते. वयाच्या सातव्या वर्षापर्यंत ओशो आजोळीच राहिले. खुद्द ओशोंच्या म्हणण्यानुसार आजीने दिलेल्या मोकळिकीचा त्यांच्या जडणघडणीवर परिणाम झाला. सातव्या वर्षी आजोबांचे निधन झाल्यानंतर ओशो गदरवारा येथे आपल्या आईवडिलांसोबत राहावयास गेले. आपल्या आजोबांच्या निधनाचा ओशोंच्या मनावर खोल परिणाम झाला होता. ओशो १५ वर्षांचे असताना त्यांची बालपणातील मैत्रीण आणि चुलतबहीण शशी हिचा विषमज्वर होऊन मृत्यू झाला. मृत्यूच्या या दर्शनाने ते बालपणात व तारुण्यात मृत्यूविषयी अधिक चिंतन करू लागले. शाळेत असताना ते बंडखोरपणे वागत असले तरी त्यांच्यातील प्रतिभा व दर्जेदार वाद-प्रतिवाद करण्याची त्यांची क्षमता लपून राहिली नाही. ते इ.स.१९५१मध्ये वयाच्या एकोणिसाव्या वर्षी जबलपूरमधील हितकारिणी कॉलेजमध्ये महाविद्यालयीन शिक्षणासाठी दाखल झाले. निदेशकाशी झालेल्या शाब्दिक चकमकीनंतर त्यांना कॉलेज सोडावे लागले आणि जबलपूरमध्येच डी.एन.जैन कॉलेजात ते स्थलांतरित झाले. अध्यापकांशी निरंतर वाद घालण्याच्या सवयीमुळे कॉलेजमधील उपस्थितीतून त्यांना सूट मिळाली. केवळ परीक्षेसाठीच कॉलेजमध्ये यावे अशा सूचना मिळाल्याने रिकाम्या वेळात ओशो एका स्थानिक वृत्तपत्रात सहायक संपादक म्हणून काम पाहू लागले. जबलपूरमध्ये दरवर्षी तारणपंथी जैन समुदायाचे सर्वधर्म संमेलन आयोजिले जाते. या संमेलनात भाषणे करण्यास त्यांनी सुरुवात केली. इ.स.१९५१ ते १९६८ या काळातील संमेलनांमध्ये ते सहभागी झाले. विवाहासाठी माता-पित्यांनी टाकलेल्या दबावास ते बळी पडले नाहीत. नंतरच्या काळात त्यांनी दिलेल्या माहितीनुसार दि.२१ मार्च १९५३ रोजी वयाच्या एकविसाव्या वर्षी जबलपूरमधील भंवरताल गार्डनमध्ये एका वृक्षाखाली बसले असताना त्यांना ब्रह्मज्ञान प्राप्त झाले.

डी.एन.जैन कॉलेजात सन १९५५मध्ये ओशो बीए-तत्त्वज्ञान झाले. सागर विद्यापीठातून सन १९५७मध्ये ते विशेष प्रावीण्यासह एमए- तत्त्वज्ञान झाले. रायपूर संस्कृत कॉलेजमध्ये लागलीच त्यांना अध्यापकाचे पद मिळाले पण विद्यार्थ्यांच्या नैतिकतेला, चारित्र्याला व धर्माला त्यांच्यामुळे धोका असल्याचे वाटल्याने उपकुलगुरूंनी त्यांना बदली करवून घेण्याचा सल्ला दिला. सन १९५८पासून ते जबलपूर विद्यापीठात अधिव्याख्याता म्हणून काम करू लागले. सन १९६०मध्ये त्यांना प्राध्यापक म्हणून बढती मिळाली. विद्यापीठातील कर्तव्ये सांभाळून ओशोंनी समांतरपणे आचार्य रजनीश- आचार्य म्हणजे गुरू. रजनीश हे त्यांचे बालपणातील टोपणनाव होते म्हणून भारतभर प्रवास करून समाजवाद आणि महात्मा गांधी यांचे परीक्षण करणारी व्याख्याने दिली. समाजवादाने केवळ दारिद्र्याचेच समाजीकरण होईल आणि गांधी हे दारिद्र्याची पूजा करणारे आत्मपीडक प्रतिक्रियावादी आहेत, असे ते मत मांडू लागले. मागासलेपणातून बाहेर पडण्यासाठी भारताला भांडवलवाद, विज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान व लोकसंख्या नियंत्रणाची गरज असल्याचे त्यांचे मत होते. पारंपरिक भारतीय धर्म मृतवत आहेत, त्यांच्यात पोकळ धर्मकांडे आहेत, अनुयायांचे ते शोषण करतात, अशी ते जहरी टीका करू लागले. अशा वक्तव्यांमुळे ते वादग्रस्त ठरले, मात्र ओशोंना काही निष्ठावान अनुयायीही मिळाले. अशा अनुयायांमध्ये बरेच श्रीमंत व्यापारी आणि उद्योगपती होते. अशा अनुयायांनी देणग्या देऊन ओशोंकडून आध्यात्मिक प्रगतीसाठी व दैनंदिन जीवनासाठी सल्ले घेण्यास सुरुवात केली. हळूहळू हे लोण देशभर पसरले. सन १९६२पासून त्यांनी तीन ते दहा दिवसांची ध्यान शिबिरे घेण्यास प्रारंभ केला आणि नंतर जीवन जागृती आंदोलन म्हणून विख्यात झालेली ध्यानकेंद्रे उदयास आली. सन १९६६मधील एका वादग्रस्त व्याख्यान सत्रानंतर विद्यापीठाच्या विनंतीनुसार त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला.

दि.२८ ऑगस्ट १९६८मध्ये मुंबईच्या भारतीय विद्या भवन सभागृहात प्रेम या विषयावरील पाच व्याख्यानांच्या मालिकेतील पहिले व्याख्यान ओशोंनी दिले. लैंगिक ऊर्जेच्या रूपांतरणातूनच प्रेम आणि ध्यान निर्माण होतात, असे त्यांनी म्हटले. लोकांमधून या मतावर संतप्त प्रतिक्रिया आल्या. आयोजकांनी व्याख्यानमाला रद्द केली. बरोबर एका महिन्यानंतर मुंबईतच गवालिया टँक मैदानावर प्रचंड श्रोतृसमुदायासमोर त्यांनी व्याख्याने देऊन मालिका पूर्ण केली. नंतर संभोगातून समाधीकडे या नावाने प्रकाशित झालेल्या या व्याख्यानमालेमुळे भारतीय माध्यमांनी त्यांना सेक्स गुरू अशी उपाधी दिली. सन १९६९मध्ये झालेल्या दुसऱ्या जागतिक हिंदू परिषदेत त्यांनी धर्मगुरूंवर स्वार्थीपणाचा आरोप केला आणि धर्म म्हणजे जीवनाचा आस्वाद कसा लुटावा हे शिकवणारी कला आहे, असे मत मांडले. त्यांच्या भाषणादरम्यान संतप्त झालेल्या पुरीच्या शंकराचार्यांनी भाषण थांबविण्याचा असफल प्रयत्न केला. सन १९७०मधील एका वसंतकालीन ध्यान शिबिरात ओशोंनी डायनॅमिक मेडिटेशन पद्धत प्रथम सादर केली. जूनच्या अखेरीस मुंबई सोडून ते जबलपूरला निघाले. दि.२६ सप्टेंबर १९७० रोजी त्यांनी नवसंन्यासींचा पहिला गट स्थापन केला. ओशोंचे शिष्य अर्थात नवसंन्यासी होणे याचा अर्थ नवे नाव स्वीकारणे, विरागी हिंदू साधूंप्रमाणे नारिंगी वस्त्रे परिधान करणे असा होता. वैराग्यापेक्षा उत्सवपूर्ण जीवनशैली स्वीकारण्यास या नवसंन्यासींना प्रोत्साहन दिले जाई. स्वतः संन्याशाची पूजा होणे अभिप्रेत नव्हते, तर फुलाला उमलण्यास उत्तेजन देणारा सूर्य, अशी त्यांना भूमिका पार पाडावयाची होती. इथवरच्या काळात सचिव म्हणून कार्य करणाऱ्या लक्ष्मी ठाकरसी कुरुवा या त्यांच्या पहिल्या शिष्या ठरल्या आणि त्यांनी मा योगलक्ष्मी हे नाव घेतले. लक्ष्मींचे वडील धनवान होते आणि ओशोंचे अनुयायी होते. लक्ष्मींनीच पैसे उभे करून ओशोंचे प्रवास थांबविले. डिसेंबर १९७०मध्ये ओशो मुंबईतील वुडलँड्स अपार्टमेंटमध्ये निवासास गेले व व्याख्याने देत अभ्यागतांना भेटू लागले. येथेच त्यांना प्रथम पाश्चात्त्य श्रोते लाभले. यानंतर ओशोंचा प्रवास आणि सार्वजनिक सभांमधील व्याख्याने जवळजवळ बंद झाली. सन १९७१मध्ये त्यांनी भगवान श्री रजनीश ही उपाधी स्वीकारली. श्री हा सन्मानसूचक शब्द आहे तर भारतीय परंपरेमध्ये ज्या व्यक्तीमधील देवत्व लपून राहिलेले नाही, स्पष्ट दिसू लागले आहे, अशी व्यक्ती म्हणजे भगवान ठरते.

मुंबईच्या दमट जल वायुमानामुळे ओशोंना मधुमेह, दमा आणि विविध प्रतिक्रियात्मक आजार, अशा व्याधी जडल्या. सन १९७४मध्ये ते पुण्यातील कोरेगाव पार्कमध्ये निवासास आले. मा योगमुक्ता- कॅथरीन व्हेनिझिलोस हिच्या मदतीने त्यांनी ही जागा विकत घेतली होती. येथे सन १९८१पर्यंत ते शिकवीत राहिले. ही जागा आजच्या ओशो आंतरराष्ट्रीय ध्यानकेंद्राच्या मध्यभागी आहे. या जागेवरच ध्वनिमुद्रण आणि नंतर ध्वनिचित्रमुद्रण सुरू झाले. त्यांच्या व्याख्यानांचे मुद्रणही येथेच सुरू होऊन त्यांच्या शिकवणीचा प्रचार-प्रसार वाढला. पाश्चिमात्य अभ्यागतांची संख्या खूप वाढली. या जागेवर नंतर कपडे, दागदागिने, मृत्तिकाशिल्पे व सेंद्रिय सौंदर्यप्रसाधने बनविणारे केंद्र उभे राहिले. रंगमंच, संगीत व मूकाभिनयाचे कार्यक्रम येथे होऊ लागले. सन १९७५नंतर पुण्यात ह्युमन पोटेन्शिअल मूव्हमेंटमधील मानसोपचारक आले आणि ध्यानासह उपचारपद्धती हा आश्रमाच्या मिळकतीचा मोठा स्रोत ठरला. पुण्यातील आश्रम ही एक गजबजलेली जागा होती. सकाळी ध्यान, मग बुद्ध हॉलमध्ये एक ते दीड तासांची त्यांची विविध विषयांवरील व्याख्याने व प्रश्नोत्तरे; दिवसभर विविध उपचार, रात्री शिष्यांशी आणि श्रोत्यांशी वैयक्तिक संवाद, नव्या शिष्यांना दीक्षा देणे, असे कार्यक्रम असत. कोणत्या मानसोपचारांत सहभागी व्हावे ? याबाबत लोक त्यांचा सल्ला घेत किंवा स्वतःच निवड करीत. आश्रमातील प्रारंभीचे काही उपचारगट हे प्रयोगात्म होते. काही गटांमध्ये शारीरिक आक्रमकतेला तसेच लैंगिक आक्रमकतेलाही थोडीफार मुभा होती. अशा काही गटांच्या उपचारांदरम्यान झालेल्या जखमांचे उलटसुलट तपशील वृत्तपत्रांमध्ये येऊ लागले. जाने.१९७९मध्ये उपचारगटांतील हिंसा संपुष्टात आली. नंतरच्या काळातही आश्रमातील रहिवाशांकडून मादक द्रव्यांचा वापर, वेश्याव्यवसायासारखे प्रकार यांमुळे हा आश्रम वादग्रस्तच राहिला. सत्तरीच्या दशकाच्या अखेरीस हा आश्रम त्यांना अपुरा वाटू लागला, पर्यायी जागेसाठी चाचपणी सुरू झाली. आश्रम हलविण्यास त्यांचा मानस कधीच प्रत्यक्षात उतरू शकला नाही. मोरारजी देसाई यांचे जनता पक्ष सरकार आणि आश्रमातील तणावाचे संबंध त्यासाठी कारणीभूत ठरले. भूमी-वापराची मान्यता रद्द केली गेली आणि पूना आश्रम हे मुख्य गंतव्यस्थान दाखविणाऱ्या परदेशी अभ्यागतांना प्रवेशपत्र देणे सरकारने बंद केले. देसाई सरकारने पूर्वलक्ष्यी प्रभावाने आश्रमाची कर-सवलत रद्द करून अंदाजे पन्नास लाख रुपयांचा बोजा आश्रमावर पाडला. विविध धार्मिक नेत्यांशी असलेले मतभेदही आश्रम-स्थलांतराच्या आड आले. दि.२२ मे १९८० रोजी सकाळच्या व्याख्यानादरम्यान विलास तुपे नावाच्या हिंदू मूलतत्त्ववाद्याने ओशोंच्या दिशेने चाकू फेकला. स्थानिक पोलिसांना आधीच सुगावा लागलेला असल्याने ते सभागृहात हजर होते. पोलिसांनी तुपेला ताब्यात घेतल्यानंतर ओशोंनी व्याख्यान सुरूच ठेवले होते.

सन १९८१मध्ये ओशो अमेरिकेत स्थलांतरित झाले. ऑरेगॉन राज्यात त्यांच्या अनुयायांनी स्थापन केलेला सहेतुक समाज पुढे रजनीशपुरम म्हणून नावारूपाला आला. वर्षभरात या कम्यूनचा स्थानिक रहिवाशांशी जमिनीवरून कटू वाद उभा राहिला. अनुयायांनी ओशोंना वापरासाठी खरेदी करून दिलेल्या रोल्स-रॉयसही कुप्रसिद्ध ठरल्या. सन १९८५मध्ये कम्यूनच्या नेतृत्वाने जैवदहशतवादी हल्ल्यासारखे गंभीर गुन्हे केल्याचे ओशोंनी उघड केल्यावर ऑरेगॉन कम्यून कोसळले. लवकरच ओशोंना अटक झाली आणि देशागमनादरम्यान केलेल्या नियमभंगाचा आरोप त्यांच्यावर लागला. युक्तिवादाच्या तडजोडीनुसार ओशोंना अमेरिका सोडावी लागली. एकवीस देशांनी त्यांना प्रवेश नाकारला व जगभ्रमंतीनंतर ते पुण्यात आले. दि.१९ जानेवारी १९९०मध्ये त्यांचे पुण्यात निधन झाले. आज त्यांचा आश्रम ओशो आंतरराष्ट्रीय ध्यान केंद्र म्हणून ओळखला जातो. ओशोंच्या बहुमिश्र शिकवणीमध्ये ध्यान, जागृतता, प्रेम, उत्सव, धैर्य, सृजनशीलता आणि विनोद यांना महत्त्व आहे. स्थितिशील श्रद्धा, धार्मिक परंपरा आणि समाजीकरणामुळे या बाबी दबल्या जातात असे त्यांचे मत होते. पाश्चात्त्य नवयुग विचारांवर ओशोंच्या विचारांचा पगडा दिसतो. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या विचारांची लोकप्रियता वाढलेलीच दिसत आहे.

# शब्द

आधुनिक केसरी



जयेश अर्जुन माधव
संपर्क 9167710614

शब्दांमध्ये प्रचंड ताकद असते. सकारात्मक शब्दांचा पुन्हा पुन्हा वापर केला तर नक्कीच काहीतरी सकारात्मक घडू शकते. पण नकारात्मक शब्दांच्या सततच्या वापराने फार मोठे नुकसानही होऊ शकते. म्हणून शब्द हे जीवंत असतात असे म्हटल्यास वावगे ठरू नये. आपण विविध शब्दांतून बोलत असतो. आपल्या विचारांची दिशाही शब्दांतूनच स्पष्ट होत असते. एखाद्या माणसाचे बोलणे नीट लक्ष देऊन ऐकले तर त्याच्या बोलण्यातून त्याच्या मनातील तळमळ किंवा घालमेल किंवा त्याच्या विचारांची दिशा स्पष्टपणे जाणवते. म्हणून बोलताना जे चांगलं आहे, तुमच्या विचारांशी मिळतं जुळतं आहे तेच बोला. नेहमी सकारात्मक शब्द वापरून बोला. कारण शब्दांमध्ये घडवण्याची आणि बिघडवण्याची सुद्धा क्षमता असते. स्वतःच्या यशाबद्दल बोला, अपयशाबद्दल नको. स्वतःच्या विजया बद्दल बोला, पराजयाबद्दल नको. शब्दांनीच नाती जोडली जातात आणि शब्दांनीच तुटलीही जातात.'प्रेरणा' हीसुद्धा शब्दांचीच शक्ती आहे. म्हणून मित्रांनो, शब्दांचा वापर जपून करा. कारण घडणं आणि बिघडणं हा तर शब्दांचाच खेळ आहे.






# साप हा शेतकऱ्यांचा मित्र

आधुनिक केसरी



सागर सोनवणे
संपर्क 7757847104

भारतात सापडणाऱ्या विषारी सापांपैकी घोणस सापाचे विषदंत सर्वात मोठे असतात.  काही साप अंडी देतात तर काही पिल्ले. अंड्यातून पिल्ले बाहेर येण्यासाठी ४० ते १०० दिवस लागतात तर जारज सापांना पिल्ले देण्यासाठी 3 ते 6 महिने लागतात. **रंगहीन साप :** सापाचा रंग हा त्वचेतील मेलानीन या घटकावर अवलंबून असतो. त्वचेतील मेलानीन | जितकं जास्त तितका सापाचा रंग गडद दिसतो. रंगहीन  सापामध्ये मेलानीन हा घटक खूपच कमी प्रमाणात असतो त्यामुळे या सापांचा रंग फिकट दिसतो. डोळे | आणि जीभ लाल किंवा गुलाबी रांगाची असते. सापाच्या मूळ रंगा जागी पांढ | पिवळसर रंग येतो आणि अश्या वेळेस साप कोणत्या प्रजातीचा आहे हे ओळखणे | कठीण होते. रंगहीनता हा एक प्रकार चा रंग दोष असून कोणत्याही सापामध्ये हा होऊ शकतो. रंगहीनता अनुवांशिक सुद्धा असू शकते. इतर सापांच्या तुलनेत रंगहीन सापांचे आयुष्यमान कमी असते कारण या सापांना जास्त थंडी व उन्हाचा खूप त्रास होतो. याचा त्यांच्या जिवनमानावरच दुष्परिणाम होतो व हे साप अधिकच कमकुवत होतात. त्वचेचा रंग पिवळसर पांढरा असल्याने हे साप | सहज शत्रूच्या नजरेस पडतात आणि शिकार होतात. याचे दोन प्रकार आहेत

**अर्ध रंगहीन साप :** या प्रकारा मध्ये त्वचेचा रंग पिवळसर पांढरा होतो पण जीभेचा आणि डोळ्यांचा रंग बदलत नाही. ते मूळ रंगाचे असतात. पूर्ण रंगहीन साप या प्रकारामध्ये त्वचेच्या रंगा सोबतच डोळ्यांचा व जीभेचाही रंग बदलतो. डोळे व जीभ लाल किंवा गुलाबी रंगाची असते.  **सापाच्या शरीरासंबंधी माहिती : डोळे :** सापांना दोन डोळे असतात पण ते माणसांप्रमाणे तीक्ष्ण नसतात. सापाच्या शरीराचा रंग जरी वेग वेगळा असला तरी सापांना माणसाप्रमाणे रंगीत प्रतिमा दिसत नाही. त्यांची द्रुष्टी रंगहीन असते. त्यांना रंगीत प्रतिमाही कृष्णधवल दिसते, त्यातही ५ फुटा पर्यंतच स्वच्छ दिसतं त्यापलीकडील धूसर दिसतं. माणसांना कोणतीही प्रतिमा त्रिमितीय दिसते पण सापांना तीच प्रतिमा द्वीमितीय दिसते. यावरून सापांची द्रुष्टी किती कमजोर आहे याचा अंदाज येतो. सापांच्या डोळ्यावर पापण्या नसतात. त्या ऐवजी एक पारदर्शक पडदा असतो. त्याला इंग्रजी मध्ये ब्रिली म्हणतात. हा पडदा डोळ्यांमध्ये धुलीकण जाण्यापासून रोखतो आणि डोळ्यांचे रक्षण करतो.सापांच्या डोळ्यावर पापण्या नसल्यामुळे साप डोळे उघडे ठेवूनच झोपतात. **डोळे :** सापांना दोन डोळे असतात पण ते माणसांप्रमाणे तीक्ष्ण नसतात. सापाच्या शरीराचा रंग जरी वेग वेगळा असला तरी सापांना माणसाप्रमाणे रंगीत प्रतिमा दिसत नाही. त्यांची द्रुष्टी रंगहीन असते. त्यांना रंगीत प्रतिमाही कृष्णधवल दिसते, त्यातही ५ फुटा पर्यंतच स्वच्छ दिसतं त्यापलीकडील धूसर दिसतं. माणसांना कोणतीही प्रतिमा त्रिमितीय दिसते पण सापांना तीच प्रतिमा द्वीमितीय दिसते. यावरून सापांची द्रुष्टी किती कमजोर आहे याचा अंदाज येतो. सापांच्या डोळ्यावर पापण्या नसतात. त्या ऐवजी एक पारदर्शक पडदा असतो. त्याला इंग्रजी मध्ये ब्रिली म्हणतात. हा पडदा डोळ्यांमध्ये धुलीकण

क्रमश :

# गोविंदाग्रज यांच्या काव्यातील स्त्री



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**मधुवासें प्रिय हा सकलां स्वगुणांनी तूं हो बाळा, त्यापरी हा धवलत्वें सुंदरसा चारित्र्यें शोभे तैसा, तूं तरी हा दिपवी जसा नगभारा तेज तूं लोपविं धीरां, त्यापरी यापरी । वागशिल जरी। सकल जन तरी तुजसि मम तनया। शिरि धरतील हारासम या, कधिं तरी मोगऱ्याचा सुवास किती चांगला असतो हे आपण जाणतोच पण स्वगुणांनी,स्वकर्तृत्वाने मोगऱ्याप्रमाणे स्वतः च्याकीर्तीचा सुगंध सर्वत्र पसरला पाहिजे , आपले चरित्र पांढरेशुभ्र बेदाग असले पाहिजेत असे आवर्जून आपल्या मुलाला सांगणारी माता आपल्याला भेटते ती गोविंदाग्रज ह्यांच्या काव्यातून, गोविंदाग्रज म्हणजेच राम गणेश गडकरी यांचा जन्म 26 मे,1885 रोजी नवसारी जवळील गणदेवी ह्या गुजरात राज्यातील गावात झाला. काही काळ त्यांनी किर्लोस्कर नाटक कंपनीच्या नाटकांत कामे करणाऱ्या मुलांचे मास्तर म्हणून काम केले. पुढे काही काळ विदर्भातीलबाळापूर ह्या गावी ते काही दिवस शिक्षक होते.**

गोविंदाग्रज ह्या टोपणनावाने त्यांनी सुमारे १५० कविता लिहिल्या. वाग्वैजयंती ह्या संग्रहात त्यांच्या कविता समाविष्ट आहेत. रायगडावर माय जिवाची गवळण बिनधोक झोंक हिरकणी नांव ठेवुनी जाइ रोखठोक पुत्रप्रेमाने अतिशय कठीण असलेल्या रायगडाच्या बुरूजावरून उतरून तान्ह्या बाळाला भेटणारी हिरा किंवा हिरकणी ही गवळण म्हणजे छत्रपती शिवरायांच्या काळातील मातृत्वाचा जिवंत आविष्कार होय, हिरकणीचे जीवावर उदार होऊन पुत्रभेटीसाठी दिव्य करणे हा मातृत्वाच्या वैभवशाली इतिहासाचा दाखला ठरला. पुढे शिवरायांनी तिची केलेली चोळी बांगडी आणि बुरुजाला हिरकणी हे नाव देणे ह्यातून शिवरायांच्या स्त्रियांना गौरव करणे आणि स्त्री जातीचा स्वाभिमान जपण्याच्या वृत्तीचे दर्शन होते. गोविंदाग्रज ह्यांनी आपल्या काव्यातून रायगडाचे वर्णन करीत असताना हिरकणीचा प्रसंग सजीव करतानाच जिजामातेचा गौरव करत करी रायगड रायरिचा तो जिजाइचा तान्हाकोंडाण्याचा करि सिंहगड मालुसरा तान्हा रायरीच्या किल्ल्याला स्वराज्याची राजधानी करणाऱ्या शिवरायांचा गौरव जिजाईचा तान्हा ह्या शब्दात केला आहे. जिजामाता ह्यांचा संस्कार आणि स्वराज्याची आस ह्यातून शिवराय हे सर्व उभे करू शकले असे कवी ह्या ठिकाणी सुचवतात आणि ते सत्य आहे, जगातील श्रेष्ठ पुत्र आणि आदर्श माता आणि त्यांचा स्वाभिमान आणि अस्मिता म्हणजे जिजाऊ आणि शिवराय होत. शिवरायांच्या स्वराज्याच्या म्हणजेच मराठेशाहीच्या पांच संरक्षक देवी होत्या त्यात तुळजापूरची तुळजाई, सातारची मंगळाई, प्रताप -गडची भवानी आई, पुण्याची पर्वती, आणि पाराची वरदायी, - हीं तीं पांच पवित्र देवीची नावे होत. या सर्व मातृदेवता असणे ह्यातही स्त्रीची गरिमा आणि गौरव आहे, या देवींनीं शिवनेरीच्या बाळाला म्हणजे शिवाजीराजे ह्यांना निजविण्यासाठी हा पाळणा जिजाऊच्या मुखातून म्हटलेला आहे अशी उदात्त कल्पना करून गोविंदाग्रज आपल्या एका काव्यात म्हणतात, गुणि बाळ असा जागसि कां रे वायां?

**नीज रे नीज शिवराया अपरात्रीचा प्रहर लोटला बाई ॥ तरि डोळा लागत नाहीं ॥ हा चालतसे चाळा एकच असला ॥ तिळ उसंत नाहिं जिवाला ॥**

निजवायाला हरला सर्व उपाय ॥ जागाच तरी शिवराय ॥ हयात शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेचे धडे देणाऱ्या जिजाऊचा मनोभावच कवीने व्यक्त केलेला आहे. मात्र ही कविता पूर्ण नाही. शिवकाळाप्रमाणेच संत परंपरेमध्येही स्त्रियांचे महत्व अधोरेखित करताना गोविंदाग्रज ह्यांनी जनाईच्या साध्या भोळ्या भक्तीचा महिमा वर्ण केला आहे ते म्हणतात, जिथें रंगलीं साधींभोळीं जनाइचीं गाणी तिथेंच खेळे श्रीपादांची कलावती वाणी गोविंदाग्रज ह्यांच्या काव्यलेखनातून स्त्रीची अनेक रूपे प्रकट होतात, वीणावती तरुणीस ह्या कवितेतून


**घुमे नाद तो सुंदरींच्या करीं मनीं अंतरीं ही विराल्या परी**
**तशा हृदयिंच्या सर्व तारा त्वरें म्हणू लागल्यां गान एकस्वरें**

एकाच वेळी सौंदर्यवती स्त्रीच्या सुंदरतेचे वर्णन करत पुढे तिने संगीतकलेची केलेली साधना किती उच्च कोटींची आहे हे सांगताना ते म्हणतात, आज दिव्य त्या चित्तगीतापुढें असे कायसें विश्व हें बापुडें घुमे आंतल्या आंत गाणें असें कळे ते जयाचें तयाला कसें तिच्या गीतापुढे संपूर्ण विश्व लीन झाले आहे, प्रत्येकाच्या मनात तिच्या गीताचे बोल आणि संगीताचे झंकार उमटत आहेत.कोणी बोलून दाखवत नसले तरी ऐकणाऱ्याला ते स्वतःचे स्वतःला जाणवत आहे. अश्या प्रकारे संगीत साधना करणाऱ्या स्त्रीच्या साधनेला एका विलक्षण उंचीवर कवींनी नेऊन ठेवलेले दिसून येते. स्त्रीच्या सौंदर्याचे आणि तिच्या मंजुळ बोलीचे वर्णन करताना आणखी एका कवितेत कवी म्हणतात, कमलिनी मनोहर बाला । कमलमुखी शोभा वाही ॥ गुणरुप रेखिल्याऐसें । कोठेंही न्यून न कांही ॥ मकरंदें रसपूर्णा ती । कोणाला ठाउक नाहीं ॥ तिच्या सौंदर्याचे वर्णन करत असताना तिच्या चेहऱ्याला कमळाच्या फुलांची उपमा देणे, तिच्या रुपगुणात कोणत्याही प्रकारची न्यूनता म्हणजे कमतरता नाही तसेच ती मकरंदाच्या रसाप्रमाणे म्हणजे मधाप्रमाणे आहे अश्या प्रकारे कवी स्त्रीचे वर्णन करतात. मात्र स्त्रियांच्या फक्त सौंदर्याचेच वर्णन कवी करत राहतात असे नाही. उलट स्त्रियांना वरवर उथळपणाने समजण्याचा प्रयत्न करणाऱ्यां वृत्तीला कवी दुसऱ्या बाजूने विचार करायला प्रवृत्त करतात. जसे शहाजहानाआधी मेली ख्यालिखुशाली ती त्याची खडा तेवढा ताजमहालच भूषा जी या जगताची शहाजहान आणि मुमताज ह्यांच्या प्रेमात उभा राहिलेला विस्मयकारक ताजमहाल हा मुमताजच्या सुंदरतेपेक्षाही जास्त लक्षात ठेवणे गरजेचे आहे, त्यातून प्रेमाची उदात्तता आणि विलोभणीयता दिसून येते असे कवीला वाटते तर कालिदासाचे उदाहरण देताना चुकल्या तरुणा ! वेश्याक्रीडन आज तुझें स्मरणांत नसे कालिदासकृत शाकुंतल परि सरस्वतीच्या कंठि असे कालिदास वेश्यांकडे जात असे स्त्रीचा उपभोग घेत असे हे विसरून त्याने केलेली साहित्य निर्मिती त्याची प्रतिभा आणि चातुर्य लक्षात घेतले पाहिजे असे कवी सांगतात. तसेच कृष्णाच्या गोकुळातील लीला मध्ये त्याची रासक्रीडा विसरून त्याने जगाला केलेला गीतारुपी उपदेश ध्यानी घेतला पाहिजेत असे सांगत कवी म्हणतात. गोकुळांतल्या चोराचा नच गोपींना आतां त्रास श्रीकृष्णाची गीता उरली द्याया मरत्या उल्हास गोपिकांना कृष्णा कडून होणारी छेडखानी जशी लक्षात ठेवली जाते त्याच पद्धतीने कृष्णाने स्त्री अब्रूचे केलेले रक्षण जास्त महत्वाचे ठरवून तो आदर्श घेतला गेला पाहिजे. पौराणिक आणि ऐतिहासिक दाखले देत स्त्रीचे उदात्तीकरण करणाऱ्या गोविंदाग्रज यांच्या कवितेतून स्त्री सौख्याचे वर्णनही आढळून येते. प्रणय आणि लडिवाळपणा त्याच प्रमाणे अल्लडपणा, खट्याळ खोडी हे सर्व स्त्री सुलभ गुण गोविंदाग्रज ह्यांच्या काव्यातून दिसून येतात.

**तो बघुनी उघडया गाला। उन्माद मानसी भरला। स्वैरसा। संमोह पडे नयनांला। मज विसर जगाचा पडला। क्षणभरी। ठेवुनी मुख सखीच्या गाली। आणिली गुलाबी लाली। त्यावरी। हासली। फार लाजली। दूर जाहली। एक निमिषांत। झिडकारुनी माझा हात। हसतची॥**

सखीच्या उघड्या गालावर चुंबन घ्यावे त्यात तिचे लाजणे, हवेहवेश्या भावनेतून झिडकारणे इत्यादी स्त्रीच्या लज्जा आणि प्रणयातूर अल्लडपणाचे सूक्ष्म वर्णन त्यांनी आपल्या काव्यातून केलेले दिसते. मात्र याचा अर्थ त्यांच्या कवितेतील स्त्री निव्वळ शोभेची बाहुली आहे असे नव्हे तर ती तितकीच स्वाभिमानी आहे. ती गरीब आणि असहाय असली तरी तिचा स्वाभिमान जाज्वल्य आहे ते सांगताना कवी एका पुत्रशोकाने विदीर्ण झालेल्या असहाय विधवेचे दर्शन घडवताना आपल्या कवितेत म्हणतात, मी गरीब कितिही असलें। जरि कपाळ माझें फूटलें। बोलणें तरी हें असलें- खपणार नाहिं हो मजला! राजहंस माझा निजला! राजहंस माझा निजला ह्या कवितेतील आपल्या कुशीत आपले बाळ मरून पडले तरी त्याला न सोडणाऱ्या मातेचा विलाप पराकोटीचा आहे ह्यात शंका नाही मात्र त्यातही आपण गरीब आणि विधवा असलो तरी आपण वाट्टेल ते सहन करणार नाही आपल्या पुत्रावरील निरामय प्रेमामुळे तर आपला बाळ मरण पावला आहे असे कोणी म्हणूच नये हे सांगत असताना एका शोकाकुल पण स्वाभिमानी स्त्रीचे दर्शन कवी घडवतात आणि तिचा पती जेंव्हा मेला तेव्हाचा प्रसंग तिच्या अंतःपटलावर कायमचा कोरला गेला आहे हे सांगताना कवी पुढे म्हणतात,

**हें असेच सांगुनि मागें। नेलात जिवाचा राजा।**



**दाखविलाहि फिरुनी नाहीं। नाहिंत का तुम्हां लाजा?**
**न्यावयास आतां आलां। राजहंस राजस माझा!**

ह्यातून पतिनिधनाचे दुःख किती खोलवरपणे तिच्या मनात रुतून बसले आहे हे आपल्या लक्षात येते स्त्री आपल्या पतीचा मृत्यू कदापिही विसरू शकत नाही.ह्या काव्यातील स्त्रीचा विलाप आणि शोक सामान्यतः किती विदीर्ण करणारा आहे ते कवींनी आपल्या काव्यातून चित्रित केले आहे. असे हे दुःख फक्त विधवा स्त्रीलाच आहे असे नाही तर एखादेवेळी पडलेला भीषण दुष्काळ सुद्धा मातृत्वाची परीक्षा घेणारा ठरतो अश्याच एका दुष्काळाचे वर्णन करत असताना गोविंदाग्रज म्हणतात,

**दुर्दैवाची करणी अघटित कांही । दुष्काळ पसरला बाई ।**
**निज बाळाला पाजीना ती आई । गोठयांत उडाल्या गाई।**
**चहुं मुलखीं हो एकच उपासमारा । चिमणीला नाहीं चारा!**

दुष्काळाच्या भयावह परिस्थितीचे वर्णन करत असताना आई बाळाला दूध पाजू शकत नाही, आणि चिमणी सारख्या छोट्या जीवलाही चारा मिळत नाही असे कवींनी सांगितले आहे. कोणतीही आई दूधपित्या लेकराला उपाशी ठेऊ शकत नाही मात्र ह्या दुष्काळात ती त्याला दूध पाजत नाही म्हणजे तिच्या दुधाचे झरे सुद्धा आटले आहेत असे सुचवून कवी एकाच वेळी दुष्काळाची भीषणता आणि स्त्रीच्या मातृत्वाची महती सांगतात. कधी दुष्काळग्रस्त स्त्रीचे दुःख तर कधी एखादी विधवा पुत्रवियोगाने रडताना कवीला दिसते तर कधी एखाद्या बालविधवांच्या कुशीतील मुलांकडे पाहून त्या स्त्रीच्या दुःखाची जाणीव ठेवत ते दुःख कवी आपल्या कवितेतून चित्रित करत म्हणतात,

**जसें वेलीचें दलितगलित फूल**
**बालविधवेचें तसें पतित मूल**
**दिसतिं दोन्हीही सारखीं मलूल**
**कृपादृष्टीची कुणि न घालि झूल**

बाल विधवेला मिळणारी हीनदीन वागणूक आणि तिच्या होणाऱ्या हाल अपेष्टा ह्यामुळे कवींना ती बालविधवा आणि तिचे मुलं दोन्ही मलूल दिसतात. बालविधवा, विधवा इत्यादी स्त्रियांना समाजात मिळणारी हीनतेची वागणूक हा त्याकाळातील चिंतेचा विषय होता त्या प्रश्नाकडे कवींनी लक्ष वेधले आहे. आज परिस्थिती थोडीफार बदलली तरीही स्त्रियांना मानाची वागणूक मिळते असे अभावानेच दिसून येते. मग स्त्रियांनी स्वतः स्वतः चे मनोरंजन आणि स्त्रियांच्या पुरते स्वतंत्र असे सणवार साजरे करणे सुरू केलेले दिसून येते. जसे मकर संक्रांत हा दिवस आणि सण त्यांचा असतो, त्यांचे नटणे, सजणे, सवरणे हे सर्व त्यांच्या मर्जीने असते अश्याच एका संक्रांत सणाला आपल्या काव्यामध्ये शब्दबद्ध करत गोविंदाग्रज म्हणतात,

या या! आज असे सुरेख हळदीकुंकू पहा या स्थली
बत्तासे बहु खोबरे हरभरे खैरात ही चालली!
ठावे कोण न जात येत- दिधले कोणास आमंत्रण;
नाही दाद घरात ही मुळि कुणा; दे धीर हे लक्षण.

त्यातही स्त्रियांनी कुणा कुणाला आमंत्रण दिले, कोण कोण जात आहे आणि येत आहे याची दाद नसते मात्र सर्व स्त्रिया एकत्र येतात आणि एकमेकांचा सन्मान जपतात, हळदीकुंकू करतात असे चित्र पाहायला मिळते. स्त्रियांचे हे नटणे पुरुषांना आकर्षित करते हे सांगताना कवी म्हणतात,

अर्धांगी पुढती करी वश मना श्रृंगारदेवी नटे,
अर्धे जीवन सार्थ होइल इथे साक्षी मनाची पटे

अश्या ह्या सजलेल्या रूपातील अर्धांगी म्हणजे पत्नी पतीच्या मनाला आकर्षून घेते, वश करते तिच्या ह्या रूपाने आणि उत्साहाने तसेच साथ संगतीने अर्धे जीवन आपोआप सार्थक होऊन जाते अश्या शब्दात कवींनी स्त्रीच्या अस्तित्वाचा सन्मान केला आहे. प्रेमाच्या परमोच्च शिखरावरवरच स्त्रीच्या भक्तीचे पडसाद उमटून प्रेम आणि भक्तीच्या योगातून स्त्री आपले सर्वस्व वाहण्यास तयार असते. ह्या प्रेममयी स्त्रीहृदयाचे उदाहरण देताना कवींनी राधा ही स्त्री घेऊन तिचे कृष्णांसोबतसाज ऋणानुबंध रसिकांच्या समोर व्यक्त केले आहेत. जगाच्या इतिहासात भोळया भाबडया प्रेम आणि भक्तीचे इतके सर्वांग सुंदर चित्र या व्यतिरिक्त इतरत्र सापडणार नाही.

**ब्रह्मगोल त्वन्मय झाला॥ चहुकडेच मुरलीवाला॥**
**त्वद्रुप गोपिकाबाला॥**
**मी मला शून्य या कालि॥ कन्हय्या ! बजाव.**
**सावळया यशोदाबाळा ! बंधाला पडला आळा॥**
**स्वैराचा वाढे चाळा॥**
**बावरी राधिका बनलि॥ कन्हय्या ! बजाव**

स्त्री प्रेमात पडली की आपल्या मनोहारी सख्यासोबत कशी एकरूप होत जाते आणि इतर जगाला कशी विसरत जाते ह्यातून तिचे प्रेम किती निरामय असते हे सांगण्याचा गोविंदाग्रज ह्यांनी प्रयत्न केलेला आहे असे दिसून येते.एकच प्याल्यातील ह्या प्रसिद्ध नाटकातील सिंधू, गीता ही स्त्री पात्रे अजरामर करणाऱ्या गडकरी यांच्या कवितेतील स्त्री पारंपरिक जीवन आणि संस्कृती ह्यांचे दर्शन घडवणारी आहे.कधी माता तर कधी प्रणयोत्सुक सखी, कधी विलाप आणि आक्रोश करणारी माता तर कधी स्वतः च्या विश्वात सण उत्सव साजरे करणाऱ्या स्त्री मनाचे प्रतिबिंब गोविंदाग्रज ह्यांच्या काव्यातून उमटलेले दिसते.केशवसुताला आपले काव्यगुरु मानणाऱ्या आणि केशवसुतापेक्षा वेगळी काव्य शैली जोपासणाऱ्या गोविंदाग्रजांच्या काव्यातील स्त्री तत्कालीन समाज दर्शन आणि संस्कृती ह्यांचे दर्शन घडवत असली तरी ती स्त्री आपले दुःख आणि आक्रोशाच व्यक्त करते असे नाही.किंवा त्यांच्या कवितेतील स्त्री उपभोग्य वस्तू आहे असेही नाही. त्यांच्या काव्यातील स्त्री खरे म्हणजे एक व्यक्ती आहे तिला सुख दुःख इत्यादी सर्व भावना आहेत आणि तिच्या वतीने लहान सहान प्रसंगात त्या स्त्रीच्या मनावर त्या घटनांचे काय पडसाद उमटत असतील ह्याचा विचार करून गोविंदाग्रज त्या भावनेला शब्द रूप देत वाचकांच्या पुढे ती भावना काव्यरूपात ठेवतात.त्यामुळे सहज जीवनातील स्वाभाविक स्त्री दर्शन त्यांच्या काव्यातून होते असे म्हणावे लागते.

# स्त्रीला मोकळा श्वास घेता येणे हेच स्वातंत्र्य




गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**मोकळा श्वास घेणं म्हणजे आपलं स्थान दुय्यम असल्याची जाणीव न होणे . परावलंबी आहेत ही भावना चुकुन सुद्धा मनात न डोकावण सामाजिक पातळीवर वावरत असताना कोणत्याही ठिकाणी आपण दुय्यम आहेत याची प्रत्यक्ष अप्रत्यक्ष जाणीव न होणे. किंवा इतरत्र कोणाकडून तसा संकेत न मिळणं वा तशी जाणीव करून न देणं हेच स्त्रीच् स्वतंत्र्य आहे . पुरुष समाजात वावरत असताना पुरुषाला कोणीही दुय्यम समजत नाही. पुरूष समाजात मोकळा श्वास घेऊ शकतो. आणि हा आपला जन्मसिद्ध अधिकार आहे असं आपण जर समजतो. तर मग जेव्हा आपल्या सारखंच आपल्या सोबत वेगवेगळ्या नात्याने असणार व्यक्तिमत्व म्हणजे स्त्री तिच्या संदर्भात मात्र आपण मुल्यमापन करण्याची वेळ येते तर आपणं त्या ठिकाणी संकुचित भुमिका घेऊन आपलं खोटं खोटं श्रेष्ठत्व अबाधित राखण्यासाठी वेगवेगळी ताकलादु बंधनं निर्माण करतो.**

मुळात निसर्गाने जीवन हे सगळ्यांना सारखंच दिलं आहे. मग हा वरकरणी भेद का व कशासाठी, निसर्गाची धर्माची, संस्कारांची काही बंधनं असतात ती असली पाहिजेत आणि पाळली पण गेली पाहिजेत या विषयी एकंदरीत स्त्री समुहाच काही दुमत नाही. ही बंधनं पाळताना मात्र नैसर्गिक न्याय जोपासला गेला पाहिजे. कोणतीही गोष्ट एकट्याने खाण्यापेक्षा वाटुन खाल्ली तर आनंद द्विगुणित होतो. पण मोठेपणा सन्मान हा फक्त पुरुषांची मक्तेदारी आहे असं भासवत स्वतःलाच मिळाला पाहिजे अशी वृत्ती नसली पाहिजे आणि मुळात असं न करता आपल्या सोबत असणाऱ्या स्त्रिला पण तो मान सन्मान मोठेपणा आपल्या बरोबरीने मिळाला पाहिजे. तिलासुद्धा तीच जीवन संस्कारांच्या चौकटीत राहून मुक्तपणे जगता आलं पाहिजे. जगद जननी जगाची अधिष्ठात्री जन्मदाती स्त्रि ही आदी शक्ति आहे. याचा विसर न पडणे म्हणजे पुरुषार्थ. आपल्या सोबत किंवा सहवासात असणाऱ्या व्यक्तिला कधीचं दुय्यम न समजणं किंवा तशी जाणीव न होऊ देणं हेच व्यक्ती मधील पुरुषार्थच मुख्य लक्षण आहे.



विश्वाची रचना होत असताना सृष्टीच निर्माण योग्य पद्धतीने होण्यासाठी निसर्गाने जी रचना निर्माण केली आहे. त्या रचनेतील जीव सृष्टीतील मुख्य पात्र म्हणजे नर- मादी किंवा स्त्री- पुरूष हे एक नाण्याच्या दोन बाजू असल्याने समांतर महत्व आहे. हे कोणीही नाकारू शकत नाही. पण हे सत्य स्वीकारण्याची मानसिकता आजुन तरी पुरुष प्रधान संस्कृतीची झाली नाही. सध्या तरी ज्ञ पुरुष प्रधान मानसिकतेच हे अपयश आहे असंच म्हणावं लागेल. तसं पाहिलं तर युग कोणतही असेल सृष्टी वर जेव्हा जेव्हा संकटं आल तेव्हा तेव्हा आदी शक्तीने प्रकट होऊन संकटाच निवारण केल. मुळात स्त्री ही आदी शक्ती आहे आणि सामाजिक पातळीवर किंवा कौटुंबिक पातळीवर आपण जेव्हा वास्तविक विचार करतो तेव्हा आपण मोठ्या मनाने ही गोष्ट मान्य केली पाहिजे कि नारी ही दुय्यम नाही. म्हणून तीला मुक्तपणे जगता आलं पाहिजे. सगळयात महत्वाचं मुक्तपणे श्वास घेता येण गरजेच आहे आणि मुक्त श्वास घेणं म्हणजे नारीला आपण दुय्यम आहेत याची जाणीव न होऊ देणं. एका नाण्याला दोन बाजू असतात आणि या दोन्ही बाजू समान असतात कोणीतीही एक बाजू दुबळी कमकुवत नसते. किंवा कोणतीही एका बाजू प्रभावी नसते. दोन्ही बाजूचे समान मुल्य असते आणि तेव्हा ते नाणं खणखणीत आणि दणदणीत असतं. सृष्टी वर जो काही मानवी समुह आहे. त्यामध्ये स्त्री आणि पुरुष हे जरी दिसण्यासाठी भिन्न असले तरी मुल्य हे समान आहे स्त्रि शिवाय पुरुष पूर्ण नाही.आणि पुरूषाशिवाय स्त्री पुर्ण नाही. आध्यत्मिक पातळीवर तर स्त्रीच महत्व आदिशक्ती म्हणून आहे आणि तरी सुद्धा सामाजिक पातळीवर आपण स्त्रीला आजही काही प्रमाणात दुय्यम समजतो. हे दुर्भाग्य आहे. मुळात स्त्रीला मुक्तपणे श्वास घेता आला पाहिजे आणि हेच स्वातंत्र्य म्हणजे खरं स्वतंत्र आहे.समाज म्हणून वावरत असताना प्रत्येकजण एक व्यक्तिमत्त्व आहे मग ते स्त्री असेल किंवा पुरुष असेल आणि प्रत्येक व्यक्तिमत्वाचा एक स्वतःच विश्व असतं हेच विश्व मुक्तसंचार पणे निर्माण करता आलं पाहिजे जगात आलं पाहिजे अनुभवता आलं पाहिजे आणि आपलं विश्व निर्माण करताना आपला धर्म संस्कार संस्कृती याच मूल्य मात्र अबाधित राहिल पाहिजे.

# वार्ड क्र. १५ दलित वस्ती निधीपासून वंचित

## शेकडोच्या संख्येने नागरिकांनी काढला आक्रोश मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज




**धुळे :** शहरातील प्रभाग क्र. १५ नागरी दलित वस्ती सुधारणा योजने व महानगरपालिकेमार्फत विविध विकास कामे केले जातात उदा.रस्ते, गटार, पथदिवे, समाज मंदिर, पाण्याची टाकी, स्वच्छतागृह, भूमिगत गटारी, वाचनालय इत्यादी केले जातात परंतु आजपावेतो सिद्धार्थनगर, नवजीवन नगर, देशमुख नगर, भिमनगर, शनी नगर या भागात या योजने अंतर्गत एकही काम न झाल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. या संदर्भात आक्रोश मोर्चा काढून यांचा निषेधही करण्यात आला.

सरकार समाजातील उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध विकास योजना तयार करत असतात. त्याचाच एक भाग अण्णा भाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अस्तित्वात आहे. त्याद्वारे शहरी भागामध्ये महानगरपालिकेमार्फत विविध कामे केली जातात सिद्धार्थनगर, नवजीवन गर, देशमुख नगर या परिसरात सन २०१८ ते आजपावेतो एकही काम करण्यात आलेले नाही . शासनाने तर दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत म.न.पा. प्रशासनाकडे भरपूर निधी पाठविला आहे तो कुठे गेला याची माहिती आम्हास नाही. माध्यमातून या भागामध्ये १००% दलित समाजाचा रहिवास आहे. शासनाने ज्या उदात्त हेतून सदर योजना तयार केली आहे तो हेतू सफल होत आहे किंवा नाही हे बघण्याचे काम महानगरपालिकेच्या प्रशासनाचे आहे, असे असूनही ह्या १०० % दलित वस्ती असलेल्या भागामध्ये सन २०१८ पासून आजपावेतो एकही कोमे का झाली नाहीत असा प्रश्न नागरिकांच्या मनामध्ये निर्माण झाला आहे. निवेदनाच्या माध्यमातून दखल घेवून परिसरामध्ये या दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गत आलेला निधी गेला कुठे ? याची त्वरीत चौकशी करावी, तरी दलित योजना असलेल्या वस्त्यांमध्ये ही कामे का झाली नाहीत ? त्वरीत कामे करण्यात यावी, असे या निवेदनाच्या माध्यमातून मागणी करण्यात आली.

# बंजारा ब्रिगेडच्या कार्याध्यक्षपदी अज्ञानसिंग चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** घाणेगाव तांडा येथील अज्ञानसिंग चव्हाण यांची बंजारा ब्रिगेडच्या सोयगाव तालुका कार्यध्याक्षापदी निवड करण्यात आली आहे. बंजारा ब्रिगेडचे महाराष्ट्र अध्यक्ष रविकांत राठोड तसेच औरंगाबाद जिल्हाध्यक्ष मुकेश राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली बंजारा समाजातील समाजासाठी झटणारे युवा कार्यकर्ते यांना समाजाबद्दल माहिती, समाजावर होणारे अन्याय याविषयी लढा देण्यासाठी समाजाने एकत्र यावे समाजातील महिलांना न्याय मिळवून देण्याकरिता पूर्ण महाराष्ट्रभर बंजारा ब्रिगेडचे अध्यक्ष रविकांत भाऊ राठोड औरंगाबाद जिल्हा अध्यक्ष मुकेश भाऊ राठोड प्रत्येक तांड्यावरती बैठका समाजाला मार्गदर्शन करीत आहेत.

समाजाचे काम करीत असताना आपल्यामुळे संघटनेचे नाव खराब होणार नाही ही दक्षता घ्या, दिनदुबळ्या गोरगरीब लोकांना त्यांचे न होणारे काम आपल्या हाती घ्या व त्यांना न्याय मिळवून द्या असे आवाहन करण्यात आले. जोपर्यंत समाजात एकता दिसणार नाही तोपर्यंत समाजाची कामे होणार नाहीत. यावेळी मान्यवरांनी निवडीबद्दल अज्ञाणसिंग चव्हाण यांना पुढील वाटचालीच्या शुभेच्छा देऊन त्यांचा गौरव केला.

# यशवंत विद्यालयाचे रेखाकला परीक्षेचे निकाल जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदपूर :** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत कला संचालनालय मुंबई तर्फे घेणात येणाऱ्या शासकीय ग्रेड परीक्षा सन 2022 चा यशवंत विद्यालय अहमदपूर केद्रांचा एलिमेंटरी व इंटरमिजिएट चा निकाल नुकताच जाहीर झाला.केंद्र क्रमांक 134002 या केंद्रावर एलिमेंटरी साठी एकूण 314 विद्यार्थ्यांने परीक्षा दिली. त्यापैकी 300 विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून केंद्राचा एकूण निकाल 95.54 टक्के एवढा लागला आहे. तर इंटरमिजिएट परीक्षेसाठी 49 विद्यार्थी परीक्षा दिले असून 46 विद्यार्थी उत्तीर्ण झालेली आहेत.शेकडा निकाल 93.87 टक्के लागला आहे. यशवंत विद्यालयातील एलिमेंटरी परीक्षेसाठी 172 विद्यार्थ्यांने परीक्षा दिली. यापैकी कु.संध्याराणी बैकरे,स्वप्नाली देवकत्ते A श्रेणी घेऊन उत्तीर्ण झाली आहे. तर B श्रेणीत दिव्यांका कदम,नंदश्री लव्हराळे,सृष्टी सुर्यवंशी,शर्वरी मुंढे,प्रितम गायकवाड, ऋतुजा शिंदे उत्तीर्ण झाले.विद्यालयाचा शेकडा निकाल 93.60% लागला आहे.तर इंटरमिजिएट परीक्षेसाठी विद्यालयातील 28 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.A श्रेणीत शिवबा कदम, सृष्टी नागरगोजे तर B श्रेणीत श्वेता सूर्यवंशी हे विद्यार्थी उत्तीर्ण झालेली आहे.

शेकडा निकाल 92.85% लागला आहे. वरील विद्यार्थ्यांना कला शिक्षक महादेव खळुरे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. सदरचा निकाल हा ऑनलाईन स्वरुपात लागला असून उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र केंद्रावरील सहभागी शाळेला दोन वेळा व परीक्षा केंद्राला तीन वेळा डाऊनलोड करुन प्रिंट काढता येणार आहे. प्रमाणपत्र डाऊनलोड करण्यासाठी अंतिम तारीख 31 जानेवारी असून निकाल पडताळणी व प्रमाणपत्र दुरुस्ती करण्यासाठी 31 जानेवारी पर्यंत मुद्दत ऑनलाईन पद्धतीने केंद्रप्रमुखाच्या लॉगिन वरुन दुरुस्तीसाठी अर्ज पाठवून देण्याची व्यवस्था कला संचालनालय मुंबई च्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.



# धुळे जिल्हा खाटीक समाजाच्या वतीने सामूहिक विवाह सोहळा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्हा बकर कसाब खाटीक समाजातर्फे महाराष्ट्र मध्यप्रदेश गुजरात येथील समाजातील गरीब जोडप्यांचा सामुहीक विवाह सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यासाठी आमदार फारुख शाह यांच्यावतीने सर्वत्र परी मदत करण्यात आली. तसेच आमदार स्वत या सोहळ्यात जातीने उपस्थित होते. या सोहळ्यात १६ जोडप्यांचा विवाह संपन्न झाला यावेळेस या जोडप्यांना धुळे जिल्हा खाटीक समाजातर्फे घरगुती उपयोगी साहीत्य मोफत देण्यात आले.तसेच यावेळेस २० हजार लोकांचे जेवण समाजातर्फे देण्यात आलेले होते. या सोहळ्यासाठी महाराष्ट्र गुजरात मध्यप्रदेशातील खाटीक समाजातील लोकांनी सहभाग घेतला होता. या सोहळ्याच्या वेळेस महाराष्ट्र प्रदेश खाटीक समाजाचे अध्यक्ष एल.ए.खाटीक यांच्या हस्ते आमदार फारुख शाह यांचा सत्कार करण्यात आला. या वेळेस आमदार फारुख शाह यांनी समाजाच्या ज्या समस्या असतील त्या सोडविण्याचे मी विधानसभेत प्रयत्न करेल असे आश्वासन दिले.



# विकास कामालाच प्रथम प्राधान्य दिले पाहिजे : मुख्याधिकारी मीणा कुमार

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ़**

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील नादरपूर येथील ग्रामपंचायत कार्यलय अन्तर्गत विकास कामाचा आढावा घेण्या करिता मीना कुमार (मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.औरंगाबाद) यांनी धाउती भेट देऊन गावातील विकास कामांची पाहणी केली. त्यांचे सोबत गट विकास अधिकारी ढोकणे, सहायक गट विकास अधिकारी महाजन, पं. स.विस्तार अधिकारी चव्हाण, विस्तार अधिकारी दारकुंडे, पाणी पुरवठा उपअभियंता अपशिंगे, शाखा अभियंता घुगे, तांत्रिक अभियंता (मग्रारोहयो) खैरणार हे होते.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी मीना कुमार यांनी नादरपूर गावांत फिरून ग्रा.प.ने केलेल्या विकास कामाची तसेच शाळेतील झालेली कामे,संगणक कक्ष, दुमजली सा. शौचालयाचे काम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका ,संगीत कार्यालय, जेष्ठ नागरिक कक्ष, इ.कामे पाहून व ग्रामस्थांचा शिक्षणाकडेकडे असलेला कल पाहून समाधान व्यक्त, तसेच प्रत्येक ग्रामपंचायत कार्यलय यांनी विकास कार्य करण्यात गरज असल्याचे सांगितले तसेच ग्रामपंचायत पिम्परखेड़ा यांनी विकास उच्च दर्जचे केल्याचे दिसत आहे, तसेच येथील ग्रामपंचायत कार्यलय व कर्मचारी विकास कार्यसाठि नेहमी तत्पर असल्याचे चित्र दिसत आहे, विकास कार्याची सुरवात ही ग्राम पंचायत कार्यलय पासून सुरवात होते. याप्रसंगी शालेय समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, तंटा मुक्ती समिती अध्यक्ष, शाळेचे मुख्यध्यापक श्री गाडेकर सर, माजी सरपंच, ग्रा.प.चे सरपंच,उपसरपंच, ग्रामसेवक, ग्रा. पं. कार्यकारी मंडळ, पदाधिकारी, जवखेडा खु.चे ग्रामसेवक पवार साहेब, जामडी (जहागीर) चे ग्रामसेवक दत्ता निकम साहेब,ग्रा. पं. कर्मचारी ,अंगणवाडी सेविका ,मदतनीस, आशा सेविका व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ग्रामपंचायतला भानुदास दगडू निकम यांच्याकडून 11 हजारांची देणगी :** नादरपुर येथील ग्रामपंचायत कार्यलय मध्ये विकास काम व्हावे यासाठी येथील नागरिक नेहमी देंनगी देत असता गुरुवार रोजी येथील भानुदास दगडू निकम रा .नादरपूर ता .कन्नड जि .औरंगाबाद ह .मु. वाफी( गुजरात )यांनी त्यांचा मुलगा श्री कृष्णा भानुदास निकम व सौ .कां .काव्या कृष्णा निकम या नवीन जोडप्याच्या विवाहानिमित्त पर्यावरणाचे संतुलन राखण्याच्या दृष्टीकोनातून ग्राम पंचायत नादरपूर येथे वृक्ष लागवड करणेसाठी स्वत : पुढाकार घेऊन र .रु .11000/-देणगी देऊन 5 पोस्टल पाम ची झाडे कुंडीसह दिली त्याबद्दल या नवीन दाम्पत्यांचे व त्यांचा ग्राम पंचायत नादरपूर तर्फे सत्कार करण्यात येऊन विशेष अभिनंदन करण्यात आले .तसेच विकास कार्य करण्यासाठी ग्रामस्थानची देंनगी व नेहमी सहकार्य मिळत असल्याने सरपंच सविता निकम यांनी ग्रामस्थाचे सहकार्य मिळत असल्याने त्यांनी गांवकरयांचे आभार मानले .



# पोखरा योजनेतील गैरव्यवहाराबाबत स्वाभिमानीचे पुन्हा उपोषण

## भोकर तालुक्यातील प्रकार; कंत्राटदाराचे चांगभले

आधुनिक केसरी न्यूज


**पैठण :** विभागीय आयुक्त औरंगाबाद यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण सोडविण्यासंदर्भात लेखी आश्वासन देऊनही अद्याप पर्यंत नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेमध्ये झालेल्या गैरव्यवहारांमध्ये दोषींवर कुठलीही कार्यवाही होत नसल्याने वरिष्ठ यांना पाठीशी घालत असल्याचा अरोप करत 25 जानेवारी पासून पुन्हा आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करणार असल्याची ज्ञानदेव मुळे यांनी सांगितले. पैठण तालुक्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत समाविष्ट असलेल्या गावांमध्ये लाभ दिलेल्या प्रत्येक घटकाची लाभार्थी निहाय चौकशी होणे बाबत व खरीप हंगाम 2022 मध्ये पैठण तालुक्यातील अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांनी भरलेल्या पिक विम्याची विमा कंपनीकडून संरक्षित रक्कम मिळणे. तसेच तालुका कृषी अधिकारी पैठण व अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांनी पैठण तालुक्यातील नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या गावांमध्ये लाभार्थी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर बोगस व बनावट लाभ देऊन लाखोंचा आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत मा . उपविभागीय कृषी अधिकारी औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखालील गठीत चौकशी समितीने काही प्रायोगिक गावांमध्ये चौकशी केली असता मोठ्या प्रमाणावर लाखोंचा गैरव्यवहार केल्याबाबत दिनांक 23/09/2022 रोजी मा . जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी औरंगाबाद यांना सादर केलेल्या अहवालामध्ये म्हटलेले आहे . तसेच सदरील अहवालामध्ये उर्वरित लाभार्थी शेतकऱ्यांची बाकी राहिलेली चौकशी पोलीस संरक्षणात करण्याबाबत म्हटलेले आहे . परंतु अद्याप पर्यंत सदरील बाकी राहिलेली चौकशी करण्यात आलेली नाही . तसेच सदरील चौकशी अहवालामध्ये दोषी तालुका कृषी अधिकाऱ्यांसह इतर अधिकारी व कर्मचारी यांच्यावर प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत प्रस्तावित केलेले असताना देखील वारंवार आपल्या कार्यालयाकडे पत्र व्यवहार करून सुद्धा संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कुठल्याही प्रकारे कार्यवाही करण्यात आलेली नसल्या कारणामुळे 25 जानेवारी पासुन पुन्हा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने उपोषण करणार असल्याची माहिती युवा जिल्हाध्यक्ष ज्ञानदेव मुळे यांनी दिली.

# पेपर लिहिता-लिहिता अनन्याने शाळेत घेतला अखेरचा श्वास

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** अरिहंत इंग्लिश स्कूलमध्ये इयत्ता तिसरीमधील अनन्या भादुले (वय



9) वर्गामध्ये पेपर लिहीत होती. त्यावेळी अचानक तिला मेंदूविकाराचा झटका आल्याने ती जागीच गतप्राण झाली. घाबरलेल्या वर्ग शिक्षकांनी तिला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात नेले. मात्र, उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाला होता. प्राथमिक माहितीनुसार अनन्याला ब्रेन हैम्रेज झाल्याची शक्यता वर्तविली जात आहे. पंढरपूरच्या अरिहंत इंग्लिश स्कूलमध्ये ही दुर्दैवी घटना घडली आहे. गुरुवारी अनन्या सकाळी 8 वाजता परीक्षा देण्यासाठी शाळेत आली होती.आज मराठीचा पेपर होता. अनन्याने संपूर्ण पेपर सोडविला. पेपर सुटण्यास काही वेळ शिल्लक असताना अनन्याला अचानक झटका आला. तिने हातपाय वाकडे केले. तिची अवस्था पाहून शिक्षकांनी तिला उचलून उपचारासाठी नेले. मात्र, त्याचा उपयोग झाला नाही. अनन्याची तब्येत गेल्या दोन दिवसांपासून ठीक नव्हती. तिला ताप येत होता अशी माहिती मिळाली आहे.

# विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानदृष्टी वाढीसाठी उपक्रमशील प्रयत्न : लटके

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** अंकगणीताच्या शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनसुद्धा वाढीस लागला पाहिजे. त्यांच्यामध्ये विज्ञान दृष्टी निर्माण व्हावी यासाठी विज्ञान अध्यापक मंडळाच्या माध्यमातुन सर्व वरीष्ठ पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली व सहकारी पदाधिकाऱ्यांना सोबत घेवून विविध उपक्रम राबविण्याचा प्रयत्न करू असे प्रतिपादन पंढरपूर तालुका विज्ञान अध्यापक मंडळाचे नुतन अध्यक्ष गणेश लटके यांनी केले.

महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीच्या पंढरपूर कार्यालयामध्ये पंढरपूर तालुका विज्ञान अध्यापक मंडळाची बैठक पार पडली. यावेळी मंडळाच्या नुतन कार्यकारणीची निवड करण्यात आली. यावेळी नुतन अध्यक्षपदी बाभुळगाव येथील रेणुका विद्यालयाचे शिक्षक गणेश लटके यांची निवड करण्यात आली.



**विज्ञान अध्यापक मंडळ उत्कृष्ट काम करेल :** तालुक्यातील विज्ञान अध्यापक मंडळाचे कार्य विद्यार्थी व शिक्षकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे . जेष्ठ विज्ञान शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सध्या निवडण्यात आलेली कार्यकारणीसुध्दा चांगले काम करून विविध उपक्रम राबवेल . तसेच विज्ञान शिक्षकांसाठी प्रभावी काम करेल . **दत्तात्रय सावंत, माजी शिक्षक आमदार**

निवडीनंतर उपाध्यक्ष सचिन नकाते ,सचिव चंद्रशेखर केचे, कार्याध्यक्ष विश्वास नागणे या नूतन पदाधिकाऱ्यांचा माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य विज्ञान अध्यापक महामंडळाचे सल्लागार लक्ष्मीप्रसाद मोहिते, शिक्षक पतससंस्थेचे चेअरमन समाधान घाडगे, संचालक मारुती गायकवाड, अभिमान पवार, मुख्याध्यापक आयचित, अशोक नळे, रणजित पवार, कुरे, अमळणेरकर, घनश्याम शिंदे उपस्थित होते. पुढे बोलताना लटके यांनी माजी आ. दत्तात्रय सावंत यांच्य मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पदाधिकाऱ्यांनी जी जबाबदारी टाकली आहे. ती जबाबदारी चांगल्या कामाच्या स्वरूपातुन सार्थ ठरविणार असल्याचे सांगितले.

# पुरस्कारप्राप्त पत्रकारांचा पीरबावडा येथे सत्कार

## फुलंब्री तालुक्यातील सर्व पत्रकारांचा ग्रामस्थांनी केला गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**सुरेश बोकील**

**पीरबावडा :** फुलंब्री तालुक्यातील अनेक पुरस्कार प्राप्त गुणवंत पत्रकारांचा पिरबावडा ग्रामपंचायतच्या आणि सरपंच डॉ. सारंग गाडेकर व गाडेकर पा मित्र मंडळ यांच्या वतीने पत्रकारांचा सत्कार करत पत्रकारांचा गौरव सन्मान करण्यात आला. हा कार्यक्रम 20 जानेवारी रोजी सकाळी पीरबावडा येथे संपन्न झाला.



पीरबावडा तालुका फुलंब्री या पाच हजार लोकसंख्येच्या गावात नुकत्याच झालेल्या निवडणुकीत जनतेतून सरपंच म्हणून बहुमताने डॉक्टर सारंग गाडेकर हे निवडून आले. त्यांच्या निवडीनंतर त्यांच्या मित्रमंडळाकडून तालुक्यातील गुणवंत व पुरस्कार प्राप्त पत्रकारांचा सत्कार 20 जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला होता. यावेळी अप्रतिम मीडियाचा मुख्यमंत्र्याचा हस्ते देण्यात आलेला पुरस्कार सकाळचे नवनाथ इधाटे यांना व उदगीर येथील सेवाभावी संस्थेचा मराठवाडा स्तरीय पुरस्कार गणेश जाधव यांना प्राप्त झाला होता. तर अनेक पुरस्कार विविध पत्रकारांना देण्यात आलेले आहे. या सर्वांचा नव निर्वाचित सरपंच डॉक्टर सारंग गाडेकर व मित्र मंडळाच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला होता. यावेळी पत्रकार लोकमतचे रऊफ शेख, नवनाथ इधाटे, गणेश जाधव संजय मोरे, दादासाहेब काळे, पंढरीनाथ काळे, महावीर जयस्वाल, नंदू हापत, बाबासाहेब सोनवणे, इस्माईल मौलाना, यांच्यासह पीरबावडा येथील पत्रकार बाबासाहेब ठोंबरे, सुरेश बोकील, सलिम शहा, अलिम शहा या पत्रकार बांधवांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच डॉ. सारंग गाडेकर व वाघलगाव सरपंच आप्पा पाटील काकडे यांचा पत्रकारांनी सत्कार करून सरपंच यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी रामदास काकडे, आप्पा पा. काकडे, शिवनाथ पा. गाडेकर, काकाजी बोकील, कृष्णा पाटील, वाजेद शेख, रामेश्वर गाडेकर, राजू खैरनार, डॉ. सलिम खान, सांडू पा काळे, उमेश फलफले, सोपान काळे, निवृति काळे, कचरू जैस्वाल यांच्यासह अनेक प्रतिष्ठीत नागरिक हजर होते.



# स्वातंत्र्य सेनानी हेमू कलानी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त अनोखी मानवंदना

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** संपूर्ण राष्ट्र स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत आहे आणि स्वातंत्र्यासाठी जीवन बलीदान करणाऱ्या हेमू कलानी यांना अनोख्या प्रकारे मानवंदना देण्यात येणार आहे. यासाठी सर्व समाज बांधवांनी धुळेकर जनतेने मोठा प्रतिसाद द्यावा यासाठी सुरेश कुंदनानी यांनी पत्रकार परिषद घेऊन आवाहन केले.

क्रांतीकारी हया जन्म शताब्दीत दिनांक २१ जानेवारी २०२३ रोजी हेमू कालाणींचा बलिदान दिवस आहे आणि आम्ही सर्व धुळेकरांच्या वतीने मानवी साखळी तयार करून सुमारे अकराशे फुट राष्ट्रिय ध्वज मानाने फडकविण्यात येईल. अशी माहिती संयोजक सुरेश कुंदनाणी यांनी पत्रकार परिषदेत दिली. दिनांक २१ जानेवारी रोजी सकाळी ०९ : ०० वाजता सिंधुरत्न सेवा संस्थेच्या नेतृत्वात नवजिवन इंग्लिश स्कूल, सिंधुरत्नज इंग्लिश स्कूल, अँथोनी स्कुल व स्वामी टेऊराम हायस्कूल चे विद्यार्थी व धुळेकर अकराशे मिटरचे राष्ट्रिय ध्वज साक्री रोडवर झुलेलाल मंदिरापासून मानव साखळी तैयार करून मानाने फडकविणार हया मानव साखळीत धुळे येथिल सर्व सिंधी बहावलपूरी पंचायत व सामाजिक संस्थानचे प्रतिनीधी आपले सहभाग नोंदविणार आहेत. सकाळी ०८:४० वाजता झुलेलाल मंदिर परिसरात अमर जवान ज्योतीचा सजीव देखावा करून अमर जवान ज्योती व हेमू कालाणी यांच्या प्रतीमेवर पुष्प चक्र व माल्यापर्ण करून श्रध्दा सुमन अर्पित करण्यात येईल .

# ब्राह्मण महासंघाच्या वधू-वर मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वधू - वर मेळाव्याला उत्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. औरंगाबाद जिल्हा कार्यकारिणीने सामाजिक बांधिलकी जपत वधू - वर मेळाव्याचे मोफत आयोजन करण्यात येते. सामाजिक उत्तरदायित्वाच्या कर्तव्य भावनेतून नवीन उपक्रम राबविले जातात असे उद्गागार जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक यांनी एका बैठकीदरम्यान केले. वधू - वर मेळाव्याचे आयोजन यशस्वीरित्या होतात. त्याच उदात्त कर्तव्य भावनेतून गतवर्षी तीन वधू - वर मेळावे आयोजित करण्यात आले होते. सुनियोजित आखणी, उत्तम व्यवस्था आणि उदंड प्रतिसाद ही या तीनही मेळाव्याचे वैशिष्ट्य आहे. निःशुल्क वधू - वर सूचक केंद्र स्थापन करण्यात आले आहे. अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने २९ जानेवारीला वधू - वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

अखिल भारतीय ब्राह्मण संघटना कार्यकारणीने घेतलेल्या निर्णयानुसार २०२३ मधील पहिला वधू - वर मेळावा रविवारी (दि. २९) सकाळी १०.३० ते दुपारी ३.३० दरम्यान श्री समर्थ राम मंदिर. समर्थनगर येथे. आयोजित करण्यात आला आहे. अखिल भारतीय ब्राह्मण संघटना जिल्हा संभाजीनगर व्यावसायिक उद्देश न ठेवता केवळ सामाजिक बांधिलकीतून मागील दोन वर्षापासून सातत्यपूर्ण वधू - वर मेळावा आयोजित करीत आहे. दोन वर्षात किमान १२०० विवाह जुळणी प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभाग, वधू - वर परिचय पुस्तिकेच्या नोंदणीतून जवळपास बेचाळीस विवाह झाले. महाराष्ट्रात व राज्याबाहेर वधू - वर पुस्तिका वितरण करण्यात येतात. ज्यायोगे अनुरूप स्थळ मिळण्यास मदत होते. विवाह जुळण्यासाठी विश्वसनीय जनसंपर्क असलेल्या कार्यकारणीतील पदाधिकारी व सदस्य



यांचे योग्य मार्गदर्शन व उत्तम सहकार्य करत असल्याचे या वेळी घेतलेल्या बैठकीत जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक यांनी या वेळी सांगितले. बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. वधू - वर परिचय मेळावा समिती : * जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक ९९२२५२६६८७., ९४२२२०६६८६., महिला जिल्हाध्यक्ष सुचेता पालोदकर, ७५८८६४०७६६, महिला शहराध्यक्ष अंजली गोरे, ९३२५२६०८६८, महिला जनसंपर्क विभाग गायत्री न्यायाधीश, ७०६६५७७८९७ यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन महासंघाच्या वतीने करण्यात आले आहे. **कार्यकारिणी व समिती सदस्य :** स्मिता नगरकर, सीमा नांदापूरकर, स्मिता जोशी, किरण शर्मा, अंजली पराडकर, डॉ. मयुरी जोशी, प्राजक्ता तांबोळी, रश्मी ढापरे, शिल्पा देशपांडे, वर्षा कुलकर्णी, मीना महाजन, रेणुका जोशी, ॲड. प्रकाश महाजन, ॲड. नरेंद्र देव, कुणाल वैद्य, सुभाष जोशी, कालिदास त्रिवेदी, उदय कुलकर्णी (तालुकाप्रमुख कन्नड) नंदू अदवंत, संजय टोनपे, मोहन काळे, चंद्रशेखर देशपांडे, मांडे काका यांचा समावेश आहे. या वधू - वर मेळाव्याच्या नियोजनासाठी निधी संकलन तसेच दात्यांनी निधी देण्यासाठी अखिल भारतीय ब्राह्मण संघटना औरंगाबाद यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन नंदू अदवंत यांनी ही माहिती दिली आहे.

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती औरंगाबाद

सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977

# महाराष्ट्र केसरीसह विजेत्या मल्लांना बक्षिसांचे वितरण



आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** महाराष्ट्रराज्य कुस्तीगीर परिषदेच्या अस्थायी समितीच्या मान्यतेने संस्कृती प्रतिष्ठान व पुण्याचे माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांच्या वतीने नुकत्याच पार पडलेल्या ६५ व्या राज्य अजिंक्यपद वमहाराष्ट्रकेसरीकिताब कुस्ती स्पर्धेचे बक्षीस वितरण आज झाले. महाराष्ट्र केसरी मुख्य किताब विजेता, उपमहाराष्ट्र केसरी, १८ वजनी गटातील विजेते, सांघिक विजेते, उपविजेते यांना घोषित केलेल्या थार, टॅक्ट्ररसह जावा गाड्या व अन्य बक्षिसांचे वितरण झाले. कोथरुड येथील स्व. मामासाहेब मोहोळ क्रीडानगरीमध्ये झालेल्या या समारंभात यंदाचा 'महाराष्ट्र केसरी' ठरलेला शिवराज राक्षे याला महिंद्रा थार गाडी व रोख पाच लाखाचे बक्षीस, उपमहाराष्ट्र केसरी महेंद्र गायकवाड याला ट्रॅक्टर व रोख अडीच लाखाचे बक्षीस प्रायोजक व संयोजक मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते देण्यात आले. प्रत्येक वजनीगटातील विजेत्यांना येजडी जावा गाडी व रोख बक्षीस देण्यात आली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव, शिरीष देशपांडे, प्रवीण बढेकर, विशाल गोखले, चंद्रकांत भरेकर, योगेश दोडके, संदीप भोंडवे, विलास कथुरे, भुजबळ परिवार यांच्यासह विजेते आणि वजनी गटांना जावा गाड्या दिलेले मान्यवर उपस्थित होते.

येजडी जावा गाडी गादी विभागात आतिष तोडकर (बीड, ५७ किलो), भारत पाटील (को. शहर, ६१ किलो), सोनबा गोंगाणे (को.जिल्हा, ६५ किलो), विनायक गुरव (को. शहर, ७० किलो), रविराज चव्हाण (सोलापूर जिल्हा, ७४ किलो), रोहीत अहिरे (नाशिक जिल्हा, ७९ किलो), प्रतिक जगताप (पुणे जिल्हा, ८६ किलो), कालिचरण सोलनकर (सोलापूर जिल्हा, ९२ किलो), ओंकार चौघुले (को. जिल्हा, ९७ किलो), शिवराज राक्षे (नांदेड, खुला वजन गट) यांना, तर माती विभागात सौरभ इगवे (सोलापूर शहर, ५७ किलो), ज्योतिबा अटकळे (सोलापूर जिल्हा, ६१ किलो), सुरज कोकाटे (पुणे जिल्हा, ६५ किलो), अनिल कचरे (पुणे जिल्हा, ७० किलो), श्रीकांत निकम (सांगली, ७४ किलो), विशाल कोकाटे (सातारा, ७९ किलो), अर्जुन काळे (भंडारा, ८६ किलो), बाबासाहेब तरंगे (पुणे जिल्हा, ९२ किलो), सारंग सोनटक्के (मुंबई उपनगर, ९७ किलो), महेंद्र गायकवाड (सोलापूर जिल्हा, खुला वजन गट) यांना गाडी व रोख बक्षिसे देण्यात आली. मुरलीधर मोहोळ म्हणाले, "पाच दिवस कुस्तीगीरांचा मेळा भरला व तो अत्यंत भव्यदिव्य आणि यशस्वीपणे पार पाडता आला, याचे समाधान आहे. महाराष्ट्र केसरीचे जनक स्वर्गीय मामासाहेब मोहोळ यांना यातून अभिवादन करण्याची संधी आम्हाला मिळाली होती. स्पर्धा घेण्याचे जाहीर केल्यापासून ज्या गोष्टी, बक्षिसे आम्ही आश्वासित केली, त्याची पूर्तता आज झाली, याचाही आनंद आहे.

विजयी मल्लांना केवळ भेटवस्तू न देता त्याची कायदेशीर व कागदोपत्री प्रक्रिया प्रादेशिक वाहन विभागाकडे पूर्ण केल्यानंतर ही वाहने विजेत्यांना सुपूर्त केली आहेत. प्रायोजक दात्याचे, माझ्या सर्व सहकाऱ्यांचे आभार मानतो.



# महावितरणच्या हलगर्जीपणानेच बालकाचा मृत्यू

## कारवाई संदर्भात समाजवादी पार्टीचे जिल्हा प्रशासनाला निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** धुळ्यात महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे ९ वर्ष वय असलेल्या मुलाचा विद्युत खांब्याला शॉक लागून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. म्हणून विज वितरण कंपनी विरुध्द कारवाई करून संबंधीत मृत व्यक्तीच्या कुटुंबाला नुकसान भरपाई म्हणून २५ लाख रूपये देण्यात यावे, अशी मागणी निवेदनातून समाजवादी पार्टीच्या वतीने जिल्हा प्रशासनाला करण्यात आली आहे.

# रोहिला वाचवण्याच्या नादात अपघात

आधुनिक केसरी न्यूज



**बुलढाणा :** गुरुवारची मध्यरात्री रोहीच्या रूपाने त्यांना घेऊन जाणाऱ्या 'टिप्पर'समोर मृत्यूच आडवा आला. यामुळे भरधाव वाहन उलटून दोघे जण घटनास्थळीच दगावले तर पाच जण जायबंदी झाले. मोताळा तालुक्यातील वडगाव मार्गावरील चांदखेड नाल्याजवळ गुरुवारी( दि. १९) मध्यरात्री हा भीषण अपघात झाला. आडवे आलेल्या रोहिला वाचवण्याच्या नादात भरवेगातील रेतीवाहक टिप्पर उलटले. यामुळे टिप्पर वर बसलेले दोन मजूर फेकल्या गेल्याने जागीच ठार झाले तर पाच जण गंभीर जखमी झाले.
चालक किरण अरुण इंगळे अंदाजे (३२, रा. सारोळा मारुती, तालुका मोताळा) याचा वाहन नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला. यामुळे रेतीच्या ढिगाऱ्यावर बसलेले नितीन समाधान इंगळे (वय २८) आणि विरेंद्र राजेंद्र पाटील (वय २७) हे वडगाव येथील रहिवासी असलेले मजूर फेकल्या गेले. दोघेही घटनास्थळावरच दगावले. संजय देवसिंग हिवाळे, किशोर शांताराम हिवाळे, प्रमोद विठ्ठल हिवाळे, शांताराम प्रभाकर हिवाळे आणि चालक किरण इंगळे असे पाचही जण गंभीर जखमी झाले आहे. बोराखेडी पोलिसांनी प्रवीण पाटील यांच्या फिर्यादीवरून ट्रकचालक किरण इंगळे याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# भारतीय संस्कृती व मातृशक्तीला प्रेरणा देणारी मंकर संक्रांत उत्साहात



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा येथे जि.प.प्रार्थमिक शाळेत दि.१९/१/२३ रोजी मातृ शक्तीनी, कृषी संस्कृती व भारतीय संस्कृतीचे महिलांनी अनुकरण मोठ्या आनंदात व उत्साहात मकर संक्रांत उत्सव शाळेत साजरा करण्यात आला. भारतीय संस्कृती ही कृषी संस्कृती असल्याने, शेतामधील आलेले अनेक प्रकारचे वाण सुहासीनी लक्ष्मीच्या वेशभूषा शृंगार करून शुगडात भरून हळदी-कुंकू लावून ईश्वर समर्पित एकमेकांना मोठ्या आनंद उत्सवात वान देऊन व उखाणे घेऊन मकर संक्रात उत्सव साजरा करण्यात आला.
संक्रात म्हणजे हस्तांतरण म्हणून याच दिवशी सूर्य मकर राशीत क्रमशः उत्तेकडे सरकतो. त्याचप्रमाणे कृषी क्षेत्राप्रमाणे प्रत्येक मनुष्य जातीच उत्तर प्रगती हो या अनुषंगाने अनेक राज्यांमध्ये या दिवशी अनेक नावाने परंतु एक उद्देश व एक ध्येयाने मातृ शक्ती, लक्ष्मी रूप असा शिंगार करून घरामध्ये सुख-समृद्धी कर्मशः वाढावी, घरामधील ईश्वर रूप पती परमेश्वराला दीर्घायुष्याची कामना करून ईश्वर शेतातील अनेक प्रकारे वाहन एकमेकांना निस्वार्थ भावनेने सामाजिक एक जोपासत आनंद उत्सवात साजरा करत असल्याने सरपंच मनीषाताई ज्ञानेश्वर वारांगणे व ग्रामसेविका सुरेखा पवार मॅडम यांनी हा उत्सव कृषी संस्कृती, भारतीय संस्कृतीला प्रभावित करणारा उत्सव असून या संस्कृतीचे संस्कार रुजवणारा उत्सव असल्याने सुवासिनी महिला संक्रातीस आप्तस्वकीयाना आणि मित्रमंडळींना आणि लहान मुलांना तिळगुळ तिळाचे लाडू वड्या किंवा तिळाचा हलवा आणि स्त्रियांना वाहन वाटून तिळगुळ घ्या आणि गोड गोड बोला असे सांगून श्रेयवृद्धिंगत होण्याची शुभकामना दिल्या.विवाहित स्त्रिया या दिवशी सामाजिक एक्य, कौटुंबिक परिसरातील शांतता व व्यवस्था अबाधीत ठेवणारा उत्सव असल्याने अनेक प्रकारच्या समज- गैरसमजाने दूर करणार आहे श्रीमती ए.बी.राठोड केंद्र प्रमुख यांनी असे मनोगत व्यक्त याप्रसंगी केले यावेळी सरपंच मनीषाताई ज्ञानेश्वर वारांगणे, अतुल इंगळे, अमोल शेळके, मुख्याध्यापक आनंदा वारांगणे, अवधूत सर, वाजुळगे सर, चौधरी सर, संदीप कळसकर, शिक्षकवृंद, अंगणवाडी सेविका, विद्यार्थीनी व गावातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व
उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in